दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • अंक ७५ • RNI : MAHMAR/2023/87818 • शनिवार दि.११ जानेवारी २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
कोळोना (घोडेगाव), पुलगाव जवळ, ता. देवळी जि. वर्धा

## विधानसभेत आम्ही महाविकास आघाडी धुवून काढली

# लोकसभेच्या निवडणुकीवेळी आम्ही ओव्हर कॉन्फिडंसमध्ये होतो-मुख्यमंत्री फडणवीस

**नागपूर (वृत्तसंस्था)-मुख्यमंत्री फडणवीस यांनी एका कार्यक्रमात मुलाखत देताना अनेक विषयांवर भाष्य केले. लोकसभा निवडणुकीत आम्ही ओव्हर कॉन्फिडंसमध्ये होतो आणि महाविकास आघाडी देखील होती. मात्र विधानसभा निवडणुकीत आम्ही महाविकास आघाडीचा फेक नरेटीव्हचा फुगा एका मिनिटांत फोडला आणि पूर्ण महाविकास आघाडी धुवून काढली, असा टोला फडणवीस यांनी यावेळी बोलताना लगावला. तसेच शरद पवारांनी संघाचे कौतुक केले त्यावर देखील फडणवीस यांनी भाष्य केले आहे.**

देवेंद्र फडणवीस म्हणाले, आम्ही ठरवले होते की सगळ्या चर्चा करून सरकार तयार करू. त्यामुळे जरा कालावधी लागला. यात कधी एकनाथ शिंदे नाराज, कधी अजित पवार नाराज. आता माध्यमांना देखील दोष देता येत नाही, त्यामुळे बातमी मिळाली तर ठीक नाहीतर काहीतरी बनवावी लागते. कधी कधी आम्ही लोक बातम्या तयार करतो. पण मला असे वाटत नाही की त्यात फार काही अटी शर्ती टाकल्या आणि शिंदे साहेबांनी ते तात्काळ स्वीकारले.महाराष्ट्रात आपण पाहिले आहे की एक संस्कृती आहे. दक्षिणेत पाहिले तर तिथे दोन पक्षाचे नेते एकमेकांशी बोलत नाहीत. तसे इथे नाही. मी मुख्यमंत्री झाल्यानंतर माझे पहिल्याच भाषणात सांगितले की मला महाराष्ट्राची राजकीय परंपरा परत आणायची आहे. मला बदल घडवणारे राजकारण करायचे आहे बदला घेण्याचे नाही. मला असे वाटते की त्याला प्रतिसाद सगळ्याच नेत्यांनी दिला. त्यामुळे सगळ्या पक्षाचे नेते एकमेकांना भेटत आहेत.

शरद पवार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कौतुक केले होते, त्यावर बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, लोकसभेच्या निवडणुकीत ज्यावेळी एक फेक नरेटीव्ह तयार करण्यात महाराष्ट्रात यश आले तेव्हा महाविकास आघाडीला ओव्हरकॉन्फिडन्स आला की आम्ही ही



निवडणूक आता जिंकू. आमच्यासाठी तो एक धक्का होता. तेव्हा माझ्यासह सगळेच ओव्हरकॉन्फिडन्समध्ये होतो. कारण आम्हाला असे वाटले की या फेक नरेटीव्हचा जनतेवर काही परिणाम होणार नाही, त्यांनी जे व्होट जिहाद चालू केले होते त्याचा परिणाम होणार नाही असे आम्हाला वाटले होते. पण दुर्दैवाने त्याचा परिणाम झालेला बघितला आणि महाराष्ट्राच्या निवडणुका देखील जवळ आल्या होत्या. तेव्हा आम्ही विचार संघाला सांगितले की राजकारणात तुम्ही काम करत नाही, पण सध्या जे अराजकतावादी परिस्थिती निर्माण झाली आहे त्याच्या विरोधात आपल्याला राष्ट्रीयशक्तींच्या विचारांनी उतरण्याची गरज आहे. मला असे वाटते की राष्ट्रीय विचाराच्या ज्या शक्ती आहेत याचा मूळ परिवार हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आहे. तसेच विविध क्षेत्रातील लोकांनी एकत्र येत अराजकतावादी शक्तीच्या विरोधात राष्ट्रीयशक्ती निर्माण करण्याचे योगदान दिले. त्यामुळे जो फेक नरेटीव्हचा मोठा फुगा जो तयार झाला होता, तो एका टाचणीने फोडण्यात आला आणि विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडी पूर्णपणे धुवून निघाली. शरद पवार अतिशय चाणाक्ष आहेत. त्यांनी निश्चितपणे याचा विचार केला असेल की आम्ही एवढे मोठे तयार केलेले वायु मंडल हे एका मिनिटात पंक्चर झाले, हे कसे शक्य झाले? यामागे अदृश्य शक्ती कोण आणि त्यांना लक्षात आले की ही शक्ती जी आहे ही नियमित राजकारण करणारी शक्ती नाही, हे राष्ट्रकारण करणारी शक्ती आहे. त्यातून मग त्यांनी प्रतिस्पर्ध्याचे कौतुक करावे तसे कौतुक केले असावे.

### एकनाथ शिंदे फारसे हसत नाहीत

देवेंद्र फडणवीस म्हणाले, शिंदे साहेबांच्या समोर तोच प्रश्न होता की मुख्यमंत्री होतो आणि आता उपमुख्यमंत्री व्हावे की नाही. त्यामुळे मी त्यांना माझा अनुभव सांगितला, मी म्हंटले की तुम्हाला पक्ष चालवायचा आहे. माझा पक्ष तर असा आहे की अनेक नेते आहेत, दिल्लीत वरिष्ठ आहेत. पण तुमचा पक्ष हा तुमच्या एका खांबावर उभा आहे. विभाजन झाल्यानंतर चांगले यश मिळालेला तुमचा पक्ष आहे त्यामुळे तुम्ही सरकारमध्ये आले पाहिजे. आता तुम्ही माझे चेहऱ्यावर नेहमी हास्य पाहिले असेल, पण त्यांचा चेहरा असा आहे की त्यांच्या चेहऱ्यावर फारसे हास्य नसते. पण ते मुख्यमंत्री असताना देखील त्यांचा तसा चेहरा होता पण तेव्हा कोणी बोलले नाही. आणि आता उपमुख्यमंत्री झाल्यावर बघा शिंदे साहेब हसतच नाहीत, असा एक समज तयार झाला.

### राजकारणात काहीही होऊ शकते

देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले, २०१९ पासून माझ्या विधानांमध्ये बदल झाला आहे. २०१९ ते २०२४ या काळात जे काही घडले त्यातून मी एक गोष्ट शिकलो ती म्हणजे 'नेव्हर से नेव्हर'. ही गोष्ट होणार नाही असे म्हणून चालायचेच नाही. राजकारणात काहीही होऊ शकते. म्हणजे ते झालेच पाहिजे असे नाही. उद्धव ठाकरे तिकडे जातात, अजित पवार इकडे येतात, त्यामुळे काहीही होऊ शकते. त्यामुळे राजकारणात काय होईल हे सांगता येत नाही आणि होणारही नाही असे म्हणून चालत नाही.

## मविआत एकत्र येण्यासारखं काही नव्हते:शिवसेना

# काँग्रेसच्या विचारात समानता नाही-सुधीर मुनगंटीवार

**मुंबई (वृत्तसंस्था)**

कोणताही पक्ष किंवा नेता राजकीय अमरपट्टा घेऊन जन्माला येत नाही. शिवसेना आणि काँग्रेसच्या विचारामध्ये कुठेही समानता नाही, ते रेल्वेच्या दोन पटरी जशा कधीही एकत्र येत नाही आणि आल्या तरा अपघात झाल्याशिवाय राहत नाही, असा टोला भाजपचे नेते सुधीर मुनगंटीवार यांनी लगावला आहे. सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, काँग्रेस आणि शिवसेना यांच्यात एकत्र येण्यासारखे काही नसते. एक हिंदुत्वासाठी काम करणारा तर दुसरा हिंदुत्वावर टीका करणारा पक्ष. आपल्याला आठवत असेल २४ ऑक्टोंबर २०१९ चा अशुभ वेळ, वेळी मनात इच्छा झाली. कधीकधी तात्कालीक फायद्यासाठी दूर जाणे हे त्रासदायक ठरत असते, असेही त्यांनी म्हटले आहे.सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, २०१९ ला त्यांनी जवळच्या फायद्यासाठी दूरचे नुकसान करुण घेतले. ते फक्त सत्तेसाठी ते एकत्र आले होते. राज्याचे माजी मुख्यमंत्री मा.सा. कन्नमवार यांची आज १२५ वी जयंती आहे. या निमित्त चंद्रपुरात आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. मात्र या कार्यक्रमाला चंद्रपूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आणि भाजप नेते सुधीर मुनगंटीवार उपस्थित राहणार नाही. त्यांच्या या अनुपस्थितीवर स्वत: मुनगंटीवार यांनी स्पष्टीकरण दिले आहे.



सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, विधानसभेच्या वेळी ज्यांनी बंडखोरी केली किंवा पक्षविरोधी काम केले त्यांना पक्षात पुन्हा घेताना त्यांचा दीर्घकालीन काय फटका बसेल याचा विचार केला पाहिजे. या बद्दल निर्णय पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस घेतील.सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, पराभवाचे विश्लेषण जाहीर करुण गेलेल्या पराभवाचे क्षण विजयात बदलता येत नाही. विजय आणि पराभव हे क्षणीक असतात. पण विजयाला पराभवामध्ये जाऊ द्यायचा नसेल तर तो नम्रपणे स्वीकारावा लागतो, कायमस्वरुपी पराभव करायचा नसेल तर पराभवातूनही विजयाकडे जाता येते.सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, कन्नमवार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमाला मला जाता आले नाही. माझी मुख्यमंत्र्यांशी सकाळीच चर्चा झाली. मुख्यमंत्री जात असतानाच मी त्यांना याबाबत कल्पना दिली. काल मला निमंत्रण आले तसेच दुर्गेवार यांचा कॉलही आला. मात्र काही वैयक्तिक कारणासाठी मुंबईत असल्याने आज या कार्यक्रमाला इन शक्य होणार नाही. किंबहुना माझ्या शिफ्टिंग चा आज शेवटचा दिवस असल्याने माझी गैरहजेरी असणार याची कल्पना दिली असल्याची स्पष्टोक्ती ही मुनगंटीवार यांनी दिली आहे.

## परदेशातून राज्यात येणाऱ्या मराठी उद्योजकांसाठी नवे धोरण-सामंत

**पुणे (वृत्तसंस्था)**

जे उद्योजक परदेशात गेले आहेत आणि त्यांना पुन्हा महाराष्ट्रामध्ये येऊन उद्योग करायचे आहेत त्यांच्यासाठी सरकार पुढाकार घेणार आहे. सरकारकडून चांगल्या सुविधा त्यांना दिल्या जातील. याबाबत अभ्यास करण्यासाठी ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात येणार आहे. परदेशातील अनेक उद्योजक राज्यात उद्योग सुरू करण्यासाठी उत्साही आहेत. त्याबाबत लवकरच धोरण तयार केले जाईल. त्यातून नवीन रोजगार निर्माण होतील. देशात उद्योग क्षेत्रात प्रथमच आपण एआय पॉलिसी आणणार आहोत, असे मत मंत्री उदय सामंत यांनी केले.



सामंत म्हणाले, जागतिक विश्व मराठी संमेलन यंदा पुण्यात ३१ जानेवारीपासून फर्ग्युसन महाविद्यालय मैदानावर होणार आहे. याचे उद्घाटन केंद्रीय मंत्री गजेंद्रसिंह शेखावत, राज्याचे मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री उपस्थित राहणार आहेत. साहित्यिकांचाही सन्मान या वेळी करण्यात येईल. मधू मंगेश कर्णिक आणि अभिनेते रितेश देशमुख यांचा या वेळी सत्कार करण्यात येणार आहे.

मराठी भाषा विभागाने 'लायब्ररी ऑन व्हील्स' ही संकल्पना विभागस्तरावर सुरू करण्याचा निर्णय घेतला असून त्यानंतर पुढे ती जिल्हास्तरावर कशी राबवता येईल यादृष्टीनेही प्रयत्न करण्यात येतील. उद्योग आणि मराठीला एकत्र आणण्याचा प्रयत्न सुरू असून उद्योगांनी त्यांच्या सीएसआरमधून ग्रंथालयांना जिल्हाधिकारी यांच्या माध्यमातून निधी द्यावा यासाठी प्रयत्न सुरू ओहत.

## शरद पवार गटाची महाविकास आघाडीत राहण्याची इच्छा नाही संजय शिरसाटांची चौफेर टोलेबाजी

**छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)**

राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी शुक्रवारी पुन्हा एकदा महाविकास आघाडीतील घटकपक्षांवर निशाणा साधला आहे. शिवसेनेचा ठाकरे गट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रेमात पडला आहे. तर राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाची महाविकास आघाडीत राहण्याची अजिबात इच्छा नाही. त्यामुळे शरद पवारांचा पक्ष येत्या महिन्याभरात नेमका कुठे उभा आहे हे स्पष्ट होईल, असे ते म्हणालेत.

संजय शिरसाट येथे पत्रकारांशी बोलताना म्हणाले, राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाची महाविकास आघाडीत राहण्याची इच्छा नाही. त्यामुळे त्यांचा पक्ष नेमका कुठे उभा आहे हे महिन्याभरात दिसून येईल. कारण, राष्ट्रवादीला पक्ष बदलण्याची सवय आहे. महिनाभरात त्यांचा वेगळा अजेंडा दिसेल. यासंबंधी दोन्ही पवार एकत्र येण्याचेही संकेत आहेत. दुसरीकडे, ठाकरे गटही देवेंद्र फडणवीस यांच्या प्रेमात पडला आहे. त्यांच्या प्रेमातून शरद पवार गट थकला आहे. त्यामुळे आज ठाकरे गटाला प्रवाहाच्या बाहेर राहणे परवडणारे नाही. त्यांनी वेळीच निर्णय घेतला नाही तर त्यांच्यावर माशीसारखी तडफडण्याची वेळ येईल. सध्या त्यांच्यापुढे समुद्रात उडी मारण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही.

संजय शिरसाट यांनी यावेळी काँग्रेस नेते विजय



वडेट्टीवार यांच्यावरही निशाणा साधला. विजय वडेट्टीवार हे सूर्यमुखी आहेत. ते जनता आपली नोकर या अविर्भावात होते. पण जनतेने त्यांना त्यांची जागा दाखवली. दुसरीकडे, शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे फार काळ तिथे राहणार नाहीत. ते रोहित पवार यांच्या डोळ्यात खुपत आहेत, असे ते म्हणाले.संजय शिरसाट यांनी यावेळी ठाकरे गटासोबतच्या संभाव्य आघाडीवरही भाष्य केले. ते म्हणाले, आता आमच्यात टाळी मारायची वेळ गेली आहे. आता त्यांची वेळ आहे. आम्ही कसाशासाठी त्यांच्याशी चर्चा करायची? त्यांना जाणीव होऊ द्या. त्यांनी टाळी देऊ द्या. त्यानंतर आम्ही विचार करू. सध्या त्यांची सरड्यासारखे रंग बदलणारी भूमिका संपूर्ण महाराष्ट्र पाहत आहे. त्यांचा पक्ष संपला आहे. भविष्य कुणाचे हे जनतेला माहिती आहे.

# शिर्डीत आज,उद्या भाजपचे राज्यस्तरीय अधिवेशन नड्डा, शाहांच्या उपस्थितीत कोअर कमिटीची बैठक

**शिर्डी (वृत्तसंस्था)**

विधानसभेला महाविजय मिळवलेल्या भाजपचे ११ व १२ जानेवारी रोजी शिर्डीत राज्यस्तरीय अधिवेशन होत आहे. त्यात भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह केंद्रीय मंत्री, पक्षाचे मंत्री, खासदार, आमदार, जिल्हाध्यक्ष, पदाधिकारी उपस्थित राहाणार आहेत. अधिवेशनाच्या नियोजनाची सूत्रे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखेंकडे आहेत. या अधिवेशनात भाजपच्या नव्या प्रदेशाध्यक्षपदी रवींद्र चव्हाण यांची निवड होण्याची शक्यता आहे.

स्वामी विवेकानंदांच्या जयंतीचे औचित्य साधत होणाऱ्या या अधिवेशनासाठी माजी खासदार सुजय विखे आठ दिवसांपासून शिर्डीत तळ ठोकून आहेत. अधिवेशनासाठी साई संस्थानच्या प्रसादालयाशेजारील शताब्दी मैदानावर ३ भव्य शामियाने उभारण्यात आले आहेत. ११ तारखेला भाजपच्या कोअर कमिटीची बैठक होऊन १२ तारखेला सकाळी नड्डा अधिवेशाचे उद्घाटन करतील. दुपारी शाह भाजपच्या मंत्री, खासदार, आमदारांसह १८ हजार पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करतील. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका तसेच पुढील वाटचालीच्या रणनीतीवर अधिवेशनात शिक्कामोर्तब होईल. शाह शिर्डीनंतर



शनिशिंगणापूरलाही जाणार आहेत. तेथील तयारीचा मंत्री विखे यांनी शुक्रवारी आढावा घेतला.

अधिवेशनासाठी आठ एकर जागेवर भव्य शामियाना उभारण्यात आला. त्यात पदाधिकाऱ्यांसाठी १५ हजार खुर्च्या लावण्यात आल्या आहेत. त्यात १ हजार व्हीआयपी खुर्च्यांचा समावेश आहे. ८० बाय ४० आकाराच्या मंचावर शाह, नड्डांशिवाय केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री, राज्य मंत्रिमंडळातील मंत्र्यांची आसन व्यवस्था आहे. १५ एकर जागा पार्किंगसाठी ठेवली आहे.लोकसभेला संविधानाबाबत विरोधी पक्षांकडून प्रचार झाला. तो नॅरेटिव्ह खोटा आहे असे सांगत तो पुसण्याचा प्रयत्न अधिवेशनात करण्यात येणार आहे. त्याचाच एक भाग म्हणून शाह, नड्डा, मुख्यमंत्री फडणवीसांच्या हस्ते मंचावर संविधान पुजन करण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

## तुमच्यात कर्तुत्व आणि कार्य करण्याची हिंमत आहे-विजय वडेट्टीवारांचे मोठे विधान

**चंद्रपूर (वृत्तसंस्था)**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तुम्ही सुद्धा आता नरेंद्र मोदींचे वारसदार व्हावे, असे विधान काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. कर्मवीर मारोतराव कन्नमवार यांची १२५ वी जयंती चंद्रपूर येथे साजरी करण्यात आली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देखील या कार्यक्रमाला उपस्थित होते. मात्र, या कार्यक्रमात भाजप नेते सुधीर मुनगंटीवार उपस्थित नव्हते. त्यांच्या अनुपस्थितीमुळे वेगवेगळे तर्कवितर्क लावले जात आहेत.काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार म्हणाले, खरे तर त्यावेळी यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय वारसदार म्हणून आम्ही कर्मवीर मारोतराव कन्नमवार यांच्याकडे पहायचो आणि ते नंतर मुख्यमंत्री देखील झाले. आता आम्ही तुमच्याकडे कर्तुत्व आहे, कार्य करण्याची क्षमता आणि हिंमत आहे. त्यामुळे आता तुम्ही सुद्धा नरेंद्र मोदी यांचे वारसदार व्हावे. स्वाभाविक आहे. त्यात काही वेगळे नाही, असे विजय वडेट्टीवार म्हणाले.

# शेतकऱ्याच्या जनावरांची चोरी आरोपी अटकेत,शेतकऱ्यांना दिलासा

**शिरूर । प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील रांजणगाव गणपती (MIDC) परिसरातील शेतकऱ्यांना मोठा धक्का बसला आहे. गेल्या काही दिवसांत अनेक शेतकऱ्यांच्या जनावरांची चोरी झाली असून, या घटनांमुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दि. २२ डिसेंबर २०२४ रोजी रांजणगाव हद्दीतील लांडेवस्ती, सोनेसांगवी रोडलगत राहणारे शेतकरी रमेश तबन खेडकर (वय ७२ वर्षे) यांच्या गोठ्यातून पंढरपुरी जातीच्या दोन म्हशी चोरीस गेल्या. या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध २९ डिसेंबर २०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांच्या नेतृत्वाखाली तपास पथक तयार करण्यात आले. परिसरातील रांजणगाव (MIDC),



कोंढापुरी, कासारी फाटा, तळेगाव ढमढेरे, आष्टापूर, मलठण, कवठे यमाई, शिंगवे पारगाव, नारायणगाव, ओझर, बनकरफाटा, सरळगाव आणि मुरबाड या भागातील रस्त्यांवरील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करण्यात आली.

तपासादरम्यान, आरोपी आणि चोरीला गेलेल्या म्हशी पिकअप वाहनात कळंबांड (ता. मुरबाड, जि. ठाणे) येथे नेल्याचे आढळून आले. तपास पथकाने तात्काळ छापा टाकून पद्माकर उर्फ नागेश शांताराम मोरे (वय २३ वर्षे, रा. कळंबांड, ता. मुरबाड) याला अटक केली. दुसरा आरोपी नरेश भाऊ मोरे मात्र चाहूल लागताच फरार झाला.

तपास पथकाने आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेली महिंद्रा पिकअप (गाडी क्रमांक MH-05-DK-2761), चोरीला गेलेल्या पाच म्हशी, आणि अन्य सामग्री जप्त केली. या मालमत्तेची किंमत सुमारे ७.४० लाख रुपये आहे. फरार आरोपी नरेश भाऊ मोरे हा सराईत गुन्हेगार असून त्याच्या विरोधात घरफोडी, जनावरे चोरी, आणि इतर आठ गुन्हे दाखल आहेत. या गुन्ह्याच्या चौकशीतून आणखी काही प्रकरणे उघड होण्याची शक्यता आहे.

गुन्हे उघडकीस आल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले असून, या घटनेमुळे त्यांच्या मनातील भीती काही प्रमाणात दूर झाली आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास रांजणगाव चखऊ पोलीस ठाण्याचे हवा विजय सरजिने करत आहेत. तपासकामाला अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत ढोले, पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे आणि त्यांचे सहकारी मार्गदर्शन करत आहेत.

जनावरांच्या चोरीच्या घटनांमुळे शेतकऱ्यांना आपल्या जनावरांच्या संरक्षणासाठी अतिरिक्त काळजी घ्यावी लागत आहे. ग्रामीण भागातील पोलिसांनी अशा घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी अधिक दक्ष राहावे, अशी मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे

## भेजगांव येथे उमेदच्या वतीने प्रोढशिक्षण कार्यशाळा



**मूल । प्रतिनिधी**

तालुक्यातील भेजगांव येथे महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियाना अंतर्गत अभिसरण सार्वत्रिकरण प्रकल्पाच्या वतीने एक दिवसीय प्रौढ शिक्षण कार्यशाळा ग्रामपंचायत जुनासरला येथे गुरुवारी (९) घेण्यात आली.

या कार्यशाळेचे अध्यक्ष भेजगांव येथील ग्रामविकास अधिकारी उमेश आकुलवार तर प्रमुख अतिथी म्हणून, पोलीस पाटील शशिकांत गणवीर, जि प शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश निमगडे, कुटुंबश्री एनाआरओ प्रसन्ना विके, अंगणवाडी सेविका निमाताई शेन्डे, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष आनंदराव चटारे, राजु कोसरे, विवेकानंद उराडे, जलिद मोहुर्ले उपस्थित होते.

या कार्यशाळेत गावातील निरक्षर महिलांनी सहभाग नोंदविला. महिलांना प्रोढ शिक्षणाचे महत्त्व समजून सांगत प्रौढ शिक्षणावर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच निरक्षर महिलांना प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी ग्रामपंचायतीच्या वतीने निरक्षर महिलांना बुक व पेन वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे यशस्वी संचालन सारीका बावने तर प्रास्ताविक प्रसन्ना विके आभार दिप्ती वाढई हिने मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रभाग संघाच्या अध्यक्षा विशाखा गणवीर, एनी सय्यद,जयश्री चौधरी, ज्योती वाढई आदींनी परिश्रम घेतले.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत सांबर ठार



**मूल । प्रतिनिधी**

चंद्रपूर-मूल महामार्गावर, मूल शहरापासून १ कि.मी. अंतरावर असलेल्या कक्ष क्रमांक ५२२ येथे १० जानेवारी २०२५ रोजी रात्री एका अज्ञात वाहनाच्या धडकेत एक नर सांबर ठार झाले.

घटनेची माहिती मिळताच एफडीसीएमचे वनपरिक्षेत्र अधिकारी बोथे, फिरते पथक वनपरिक्षेत्र अधिकारी घोरपडे, क्षेत्र सहाय्यक शिंदे, वनरक्षक गवई, सिंघन, गव्हारे आणि संजीवन पर्यावरण संस्थेचे सदस्य अंकुश वाणी व प्रतीक लेनगुरे घटनास्थळी पोहोचले. त्यांनी घटनास्थळी पंचनामा करून अज्ञात वाहनाविरोधात गुन्हा दाखल केला.

पुढील कार्यवाही वनपरिक्षेत्र अधिकारी बोथे यांच्या मार्गदर्शनाखाली वन विभागाचे कर्मचारी करीत आहेत.

## साकुर येथे श्रमसंस्कार शिबिराच्या उदघाटन कार्यक्रमास राणीताई लंके व जयश्री थोरात उपस्थित



**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

साकुर येथील रमेश फिरोदिया कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या कामटवाडी (पारनेर) येथे आयोजित केलेल्या राष्ट्रीय सेवा योजना, विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उदघाटन कार्यक्रमास सौ. राणीताई लंके यांच्यासह उपस्थित राहून विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून गावा-गावात स्वच्छता, आरोग्य यांसारखे अभियानातून जनजागृती व्हावी, व त्यांचे महत्व ग्रामस्थांना समजावे हा महत्त्वपूर्ण उद्देश या शिबिराचा असतो.

या शिबिरामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना खरा वाव मिळतो, त्यांच्यात राष्ट्रभक्ती व सामाजिक कार्याची प्रेरणा निर्माण होते, यातूनच त्यांच्या व्यक्तीमत्वाचा विकास होतो आणि देशाच्या प्रगतीत त्यांचा हातभार लागतो.

## चारागाव शिवारात बिबट्या मृतावस्थेत आढळल्याने खळबळ, घातपाताची शंका

**सेलू । प्रतिनिधी**

झडशी सहवन क्षेत्रातील मौजा चारगांव शिवारात ता. ८ बुधवारी सकाळी ११.३० वाजताच्या सुमारास मादी बिबट मृतावस्थेत आढळून आल्याची घटना उघडकीस आल्याने मोठी खळबळ उडाली. याप्रकरणी घातपाताची शंका व्यक्त होत असून वनविभागाचे अधिकारी चौकशी करीत आहे.

झडशी सहवन क्षेत्रातील मौजा चारगांव शिवारात आज सकाळी ११.३० वाजताच्या सुमारास बिबट्या मृतावस्थेत आढळल्याची माहिती वनविभागाला मिळाली. मौजा चारगांव शिवारातील सुधाकर लहरे नामक शेतकऱ्याच्या शेताजवळील पडीत जमिनीवर सदर बिबट्या मृतावस्थेत आढळून आला. यासंदर्भात माहिती मिळताच वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. यावेळी मादी बिबट्या मृतावस्थेत पडून होता. सदर घटना स्थळी वनविभागाचे सहायक वनसंरक्षक पवार, मानद वन्यजिव रक्षक कौशल मिश्रा, आरएफओ खेडकर, झडशी सहवनक्षेत्राचे सहायक घनशाम टाक,



वनरक्षक ए. एस. मौजान, एच. एच. भोईटे, ए. एम. ढाले, महागडे, बिटरक्षक एम. एम. कुकडे, यांनी भेट देऊन वरिष्ठ अधिकाऱ्याच्या मार्गदर्शनाखाली पंचनामा केला. दरम्यान सदर बिबट्याचा मृत्यू कशामुळे झाला किंवा घातपात घडवून आणला का? या संदर्भातील माहिती शवविच्छेदन अहवालानंतरच स्पष्ट होईल, अशी माहिती वनविभागाकडून देण्यात आली. सदर बिबटयाचा मृत्यू घटनास्थळीच झाला की, त्याला मृतावस्थेत घटनास्थळी टाकले याविषयी परिसरात उलटसुलट चर्चा सुरु असल्याचे समजते.

सदर मृत बिबटयाचे शवविच्छेदन घटनास्थळी डॉ. पानतावणे यांनी केले असून घटनास्थळावरच अंतिमसंस्कार केला.

## दुचाकीने अवैध दारूची तस्करी करताना अपघात; दोघांचा मृत्यू

### नागपूर-वर्धा महामार्गावर आमगाव फाट्याजवळील घटना

**सिंदी । रेल्वे**

नागपूर-वर्धा महामार्गावरील आमगाव फाट्याजवळ दिनांक ९ जानेवारी २०२५ रोजी मध्यरात्री १२ वाजताच्या सुमारास दुचाकीने अवैध दारूची तस्करी करताना उभ्या अज्ञात वाहनाला मागून धडक दिल्याने दोन युवकांचा दुर्दैवी मृत्यू झाला. मृतांमध्ये वैभव हेमराज राऊत (वय २२) व आलोक संतलाल उईके (वय २१, दोघेही रा. वार्ड क्रमांक ५, विकास चौक, सेलू) यांचा समावेश आहे.

सिंदी पोलीस स्टेशनकडून मिळालेल्या माहितीनुसार, वैभव राऊत व आलोक उईके हे नागपूर जिल्ह्यातून दुचाकीने अवैध दारूची तस्करी करत होते. नागपूर-वर्धा महामार्गावर आमगाव फाट्याजवळ त्यांची दुचाकी एका उभ्या अज्ञात वाहनाला मागून जोरात धडकली. या अपघातात वैभव राऊत याचा जागीच मृत्यू झाला, तर आलोक उईके याला सावंगी रुग्णालयात दाखल



केल्यानंतर मृत घोषित करण्यात आले.

अपघातानंतर घटनास्थळी मोपेड (सुजुकी कंपनीची पांढऱ्या रंगाची दुचाकी) पडलेली होती. घटनास्थळी देशी व विदेशी दारूच्या फुटलेल्या बाटल्यांचा खच पडलेला दिसत होता. या दृश्याने विदारक चित्र निर्माण झाले होते.

घटनास्थळावरील परिस्थितीचा पंचनामा करून प्रणय नरेश लोहकरे (रा. घोराड, ता. सेलू, जि. वर्धा) यांच्या तक्रारीवरून सिंदी पोलिसांनी घटनेची नोंद केली आहे. मृतदेह शवविच्छेदनासाठी सेलू ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आले आहेत. पुढील तपास सिंदी पोलीस करीत आहेत.

# शेतकऱ्याला मारहाण-देशाच्या पोशिंद्याचा अपमान;स्वामी कॉटन जिनिंग मधील प्रकार

**वरोरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील स्वामी कॉटन जिनिंगमध्ये ६ जानेवारीला घडलेली घटना शेतकऱ्यांच्या परिस्थितीवर गंभीर प्रश्न निर्माण करते. शेतकरी आपल्या शेतमालाला योग्य भाव मिळवण्यासाठी कष्ट करतो, पण जेव्हा त्याला कमी भाव देऊन त्याचा अपमान होतो आणि विरोध केल्यावर त्याला मारहाणीला सामोरं जावं लागतं, तेव्हा ही घटना व्यवस्थेतील मोठ्या त्रुटींचा आणि शेतकऱ्यांविषयीच्या बेफिकीरीचा पुरावा ठरते.

मार्डा रोडवरील स्वामी कॉटन जिनिंगमध्ये सीसीआय (कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया) च्या खरेदी प्रक्रियेदरम्यान एका शेतकऱ्याने आपल्या कापसाला लावलेला कमी भाव पाहून विरोध दर्शवला. मात्र, विरोधाची किंमत त्याला बेदम मारहाणीतून चुकवावी लागली. जिनिंगमधील कर्मचाऱ्यांनी आणि लेबरने शेतकऱ्यावर हल्ला केला.

या घटनेने शेतकरी समुदायामध्ये तीव्र असंतोष पसरला. शेतमालाला योग्य भाव मिळवण्यासाठी संघर्ष करणाऱ्या शेतकऱ्यांवर असा अन्याय होणं अत्यंत निंदनीय आहे. घटनेची माहिती मिळताच शेतकरी नेते नरेंद्र जीवतोडे आणि भाजपा ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष डॉ. अंकुश आगलावे यांनी तातडीने जिनिंग गाठली. त्यांनी केवळ घटनेचा निषेध व्यक्त केला नाही, तर जबाबदार कर्मचाऱ्यांना माफी मागण्यास भाग पाडलं. शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी लढणाऱ्या या नेत्यांच्या ठाम भूमिकेमुळे हा अन्याय तातडीने थांबवण्यात आला.

शेतकऱ्यांवर होणारा अन्याय रोखण्यासाठी राजकीय नेत्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. जीवतोडे आणि आगलावे यांनी या घटनेत न्याय मिळवण्यासाठी जे धाडस दाखवलं, ते इतर नेत्यांसाठी आदर्श ठरलं आहे. त्यांनी शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभं राहत व्यवस्थेच्या हलगर्जीला जाब विचारला.

त्यांच्या ठाम भूमिकेमुळे दोषींना माफी मागावी लागली, आणि शेतकऱ्यांचा आत्मसन्मान पुन्हा उभा राहिला. हे दाखवून देतं की, योग्य नेतृत्व शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर तोडगा काढू शकतं.

सीसीआयसारख्या संस्थेचा उद्देश शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला योग्य भाव मिळवून देणं आहे. मात्र, प्रत्यक्षात शेतकऱ्यांना कमी भाव, अन्यायकारक वागणूक आणि मारहाणीचा सामना करावा लागत असेल, तर ही




व्यवस्था अपयशी ठरली आहे. सरकार आणि प्रशासनाने शेतकऱ्यांसाठी ठोस उपाययोजना करायला हवी, नाहीतर अशा घटना पुन्हा घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

घटनेनंतर नरेंद्र जीवतोडे आणि डॉ. अंकुश आगलावे यांनी दाखवलेली भूमिका फक्त शेतकऱ्यांसाठीच नव्हे, तर इतर नेत्यांसाठीही प्रेरणादायी ठरते. त्यांची तत्परता आणि ठामपणा यामुळे शेतकऱ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला आहे.

त्यांच्या संघर्षाने हे सिद्ध केलं की, जेव्हा नेते शेतकऱ्यांसोबत उभे राहतात, तेव्हा व्यवस्थेतील अन्यायाला पराभूत करता येतं. अशा ठाम भूमिकांची आवश्यकता आज शेतकरी समाजाला अधिक आहे.या घटनेनंतर संबंधित दोषींवर कठोर कारवाई होणं अत्यावश्यक आहे. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळवून देण्यासाठी सरकारने अधिकृत देखरेख यंत्रणा मजबूत करायला हवी. शेतकऱ्यांना संरक्षण देणारी आणि त्यांच्या हक्कांसाठी लढणारी मजबूत व्यवस्था उभारणं आता काळाची गरज आहे.शेतकऱ्यांवर होणारा अन्याय थांबवण्यासाठी नरेंद्र जीवतोडे आणि डॉ. अंकुश आगलावे यांनी घेतलेली भूमिका कौतुकास्पद आहे. त्यांनी दाखवलेला ठाम पवित्रा आणि संघर्ष हा इतर नेत्यांसाठी एक आदर्श आहे. शेतकऱ्यांचा आत्मसन्मान पुन्हा उभा करण्यासाठी त्यांनी घेतलेली भूमिका आजच्या काळात प्रेरणादायी ठरली आहे. या घटनेने शेतकऱ्यांच्या न्यायासाठी लढण्याची गरज अधोरेखित केली आहे. पोशिंद्याच्या हक्कासाठी आणि त्याला सन्मान मिळवून देण्यासाठी प्रत्येक जबाबदार व्यक्तीने पुढे आलं पाहिजे.

## आजचे बालवैज्ञानिक उद्याचे शास्त्रज्ञ: संगमनेर येथील सिद्धार्थ विद्यालयातील कार्यक्रमात आ.अमोल खताळ यांचे प्रतिपादन

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**




समाजातील विविध समस्यांवर मात करण्यासाठी आवश्यक उपकरणे बालवैज्ञानिक तयार करत आहेत. त्यामुळे आजचे विद्यार्थी हे उद्याचे शास्त्रज्ञ होतील, अशी अपेक्षा आमदार अमोल खताळ यांनी व्यक्त केली.

संगमनेर येथील सिद्धार्थ विद्यालयात आयोजित तालुकास्तरीय गणित व विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन आमदार खताळ यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या उपकरणांचे कौतुक करत त्यांच्या उपक्रमशीलतेचे प्रशंसोद्गार काढले.

या कार्यक्रमाला बहुजन शिक्षण संघाचे अध्यक्ष बी. आर. कदम, कार्याध्यक्ष ड. संघराज रुपवते, संगमनेर नगरपालिकेचे मुख्याधिकारी रामदास कोकरे, संगमनेर तालुका विज्ञान व गणित संघटनेचे अध्यक्ष मनोज उपरे, बाळासाहेब राऊत आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात पंचायत समितीच्या शालेय पोषण आहार विभागाचे अधीक्षक दीपक त्रिभुवन यांनी प्रस्तावना केली, तर मनोज उपरे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कला शिक्षक प्रकाश पारखे यांनी केले, आणि आभार सिद्धार्थ विद्यालयाचे मुख्याध्यापक रघुनाथ जगताप यांनी मानले. मान्यवरांना भारतीय राज्यघटनेची प्रत भेट देण्यात आली.

संगमनेर तालुक्यातील सुमारे १०० शाळांतील विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनात सहभाग घेतला. यामध्ये विद्यार्थ्यांच्या सुमारे ३५० उपकरणांचे सादरीकरण करण्यात आले.

संगमनेर नगरपालिकेचे मुख्याधिकारी रामदास कोकरे यांनी विद्यार्थ्यांना परिसर स्वच्छता व प्रदूषण निर्मूलनाविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी विज्ञान शिक्षणाच्या महत्त्वावर भर देत, प्रदूषण निर्मूलन शक्य असल्याचे सांगितले.

हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवण्यासाठी महत्त्वाचा ठरला असून, भविष्यात शास्त्रज्ञ निर्माण करण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारा ठरला आह

## अहिल्यानगरमध्ये शनिवारी रंगणार अमृतमहोत्सवी 'मैत्री कट्टा'

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**




मैत्री ही कुणाशीही होऊ शकते. त्याला कोणतेही बंधन नाही. हाच धागा पकडून गेल्या दोन वर्षांपासून नगरमध्ये होत असलेल्या 'मैत्री कट्टा' या उपक्रमाचा द्वितीय वर्धापनदिन शनिवारी (११ जानेवारी) माऊली सभागृहात सायंकाळी ५:३० वाजता होत आहे.या वेळी 'खास रे'फेम संजय कांबळे, लेखक व हौशी छायाचित्रकार नंदकुमार देशपांडे, चित्रकार के. नमिता प्रशांत व साहित्यिक अभिरूची ज्ञाते उपस्थित राहून रसिकांशी मैत्रीपूर्ण संवाद साधणार आहे. त्यांच्या माध्यमातून यंदा अमृतमहोत्सवी कट्टा रंगणार आहे.कार्यक्रमास उपस्थित राहणारे 'खास रे टिव्ही'फेम संजय कांबळे हे मराठी रॅप सिंगर असून त्यातून ते अनेक सामाजिक समस्या मांडत असतात. त्यामुळे ते लोकप्रिय झाले आहेत. नंदकुमार देशपांडे हे लेखक आणि हौशी छायाचित्रकार आहेत. विज्ञान शाखेत पदवी आणि व्यवस्थापन शास्त्रात पदव्युत्तर शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी न्यू इंडिया अश्यूरन्स या विमा कंपनीत नासिक, पुणे, मुंबई येथे विविध पदांवर नोकरी केली.त्यांनी विविध नाटकात भूमिका आणि दोन लघुपटांची निर्मिती केली आहे. के. नमिता प्रशांत जगण्यावर भरभरून प्रेम करणारी जिंदादिल व्यक्ती आहे. त्या म्यूरल आर्टिस्ट असून त्यांना पर्यटनाची आवड आहे. पारंपारिक कला तसेच प्राचीन आदिवासी कला जोपासायला आवडतात. अभिरुची ज्ञाते या प्रवासवर्णन साहित्यिक, भाषाप्रेमी आहेत.पुण्यातल्या अक्षरनंदन शाळेत मराठी भाषेच्या शिक्षिका आहेत. मैत्रीचा उत्सव साजरा करणार्या या कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन 'मैत्री कट्टा' समितीने केले आहे

## प्रदूषणावर मात करण्यासाठी बदलापूर एमआयडीसीत हरित पट्टा विकसित होणार

**बदलापूर । प्रतिनिधी**




बदलापूर एमआयडीसी परिसरात प्रदूषणाच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी हरित पट्टा विकसित करण्याची संकल्पना राबविण्यात येणार आहे. स्थानिक आमदार किसन कथोरे यांनी ही संकल्पना मांडली असून, येत्या काही वर्षांत मानकिवली, खरवई आणि पट्ट्यातील एमआयडीसी परिसरात रस्त्याच्या कडेला, मोकळ्या जागांमध्ये आणि गार्डनच्या स्वरूपात वृक्षारोपण करून हरित पट्टे तयार करण्यात येणार आहेत.

बदलापूर एमआयडीसी परिसरात अनेक स्थानिक ग्रामस्थांची घरे आणि रहिवासी संकुले आहेत. मात्र, काही रासायनिक कंपन्यांमुळे परिसरातील हवेत प्रदूषण वाढले आहे. रासायनिक वायूमुळे स्थानिकांना श्वसनासंबंधी त्रास होतो असून, प्रदूषण कमी करण्याची मागणी येथील रहिवासी अनेक वर्षांपासून करत आहेत. हरित पट्टा योजनेसाठी आवश्यक ती मंजुरी आणि निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. या योजनेद्वारे पर्यावरण संवर्धनासोबतच प्रदूषण नियंत्रण साध्य करण्याचा प्रयत्न होणार आहे, असे आमदार किसन कथोरे यांनी सांगितले.

याशिवाय, मुरबाड मतदारसंघातील बदलापूर पूर्व एमआयडीसी परिसरातील भुयारी गटार योजनेचा शुभारंभ नुकताच आमदार किसन कथोरे यांच्या हस्ते करण्यात आला. या योजनेसाठी १२८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली आहे.

एमआयडीसी परिसरातील जुन्या पाइपलाइनमुळे वारंवार गळती होत असल्याने सांडपाण्याचा प्रश्न निर्माण होत होता. रासायनिक सांडपाणी उल्हास नदीत मिसळल्याने पाणी दूषित होण्याच्या तक्रारी होत्या. मात्र, या नव्या योजनेमुळे सांडपाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटणार आहे.

नवीन भुयारी गटार योजनेअंतर्गत बदलापूर एमआयडीसी ते अंबरनाथ एमआयडीसीपर्यंत सुमारे साडेआठ किलोमीटर लांबीची पाइपलाइन टाकण्यात येणार आहे. यामुळे परिसरातील सांडपाणी व्यवस्थापन सुधारण्यास मदत होईल आणि पर्यावरणाची हानी थांबवता येईल.

या उपाययोजनांमुळे प्रदूषण आणि सांडपाणी व्यवस्थापनाचे प्रश्न सुटणार असल्याने स्थानिक रहिवाशांनी समाधान व्यक्त केले आहे. हरित पट्टा आणि भुयारी गटार योजना यशस्वीपणे राबवल्यास बदलापूर परिसरात पर्यावरणीय सुधारणा होण्याची अपेक्षा आहे.

## भंडारदरा प्रकल्प कालवा सल्लागार समितीची बैठक संपन्न

**अकोले । प्रतिनिधी**



भंडारदरा प्रकल्प कालवा सल्लागार समितीची बैठक १० जानेवारीला संपन्न झाली. या बैठकीत धरणात उपलब्ध असलेल्या पाणीसाठ्यातून उन्हाळी हंगामासाठी तीन आणि रब्बी हंगामासाठी एक आवर्तन देण्याचा निर्णय घेण्यात आला.

निळवंडे कालव्यांना १५ जानेवारीपासून आवर्तन सोडण्याच्या सूचना जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. तसेच कालव्याच्या देखभाल आणि व्यवस्थापनातील समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी अधिकारी व कॅनाल इन्स्पेक्टर यांनी गांभीर्याने काम करून नियोजन करण्याचे निर्देश दिले.

या बैठकीला खासदार भाऊसाहेब वाकचौरे, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, आमदार डॉ. किरण लहामटे, आमदार अमोल खताळ, आमदार हेमंत ओगले यांसह लाभक्षेत्रातील सहकारी संस्थांचे प्रतिनिधी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीत घेतलेल्या निर्णयांमुळे शेतकऱ्यांच्या उन्हाळी आणि रब्बी हंगामातील पाणीपुरवठा नियोजनबद्ध होणार असून, कालव्यांच्या देखभाल व व्यवस्थापनाचे काम अधिक प्रभावीपणे होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

## ठुणे यात्रोत्सवाची सुरुवात आमदार दौलत दरोडा यांच्या हस्ते महापूजा

**ठाणे । प्रतिनिधी**



शहापूर तालुक्यातील ठुणे गावच्या सांस्कृतिक वारशाचा वारसा जपणाऱ्या विठ्ठल-रखुमाई यात्रोत्सवाला शुक्रवारपासून (ता. १०) सुरुवात झाली. शहापूरचे लाडके आमदार दौलत दरोडा यांच्या हस्ते सकाळी सहा वाजता विठ्ठल-रखुमाई महापूजा होऊन यात्रोत्सवाची विधिवत सुरुवात करण्यात आली.

पौष महिन्यातील पुत्रदा एकादशीला सुरू होणारा हा तीन दिवसीय यात्रोत्सव भाविकांसाठी विशेष महत्त्वाचा आहे. ठाणे, नाशिक, मुंबई, पुणे आणि नगरसह विविध जिल्ह्यांतून हजारो भाविक दरवर्षी या ठिकाणी हजेरी लावतात. यंदा या यात्रेचं चारशे पंधरावं वर्ष असून, अलिकडच्या काळात विठ्ठल-रखुमाई मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला आहे.

यात्रेच्या दिवशी अहमदभाई शेख या मुस्लिम कुटुंबाकडून विठ्ठल-रखुमाईच्या मूर्तींसाठी पोशाख दिला जातो, ही परंपरा आजही टिकून आहे. यात्रेत विविध धार्मिक विधी, भजन-कीर्तन आणि अखंड नामघोषाचं आयोजन केलं जातं. शेवटच्या दिवशी काल्याच्या कीर्तनानं यात्रेची सांगता होते.

चारशे वर्षांपूर्वी संत गोरा कुंभार यांचे पूर्वज ठुणे गावात स्थलांतरित झाले. पुत्रदा एकादशीच्या दिवशी त्यांनी विठ्ठल-रखुमाई मूर्तीची स्थापना केली. तेव्हापासून ही यात्रा अखंडपणे सुरू आहे. पूर्वी १५ दिवस चालणारी ही यात्रा आज तीन दिवसांवर आली आहे.

यात्रेत भांडी, मिठाई, बांगड्या, शेतीची औजारे, मुलांची खेळणी यांसह वाणसामानाची मोठी खरेदी-विक्री होते. यात्रेत मनोरंजनासाठी तमाशाचे फड, आकाश पाळणे आणि स्थानिक हौशी मंडळांनी आयोजित केलेले क्रिकेट सामने भाविकांना आकर्षित करतात.

ठुणे गावातील प्रत्येक घर पाहुण्यांनी गजबजलेलं असतं. पंचक्रोशीतील लोक आपल्या नातेवाईकांना भेटण्यासाठी या यात्रेच्या निमित्ताने गावात येतात.

यात्रेची सांगता झाल्यानंतर भाविकांची ओढ मुरबाड तालुक्यातील म्हसा यात्रेकडे वळते. ठुणे यात्रोत्सव भाविकांच्या मनात आध्यात्मिक भक्ती आणि सांस्कृतिक वारशाचा एक अभिमानपूर्ण ठेवा निर्माण करतो.

## श्री स्वामी समर्थ भक्त परिवाराचा ४० एकरांत महासत्संग सोहळा

**गंगापूर । गणेश म्हैसमाळे**



श्री स्वामी समर्थ सेवा व आध्यात्मिक विकास मार्ग (दिंडोरी) प्रणित भव्य महासत्संग सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून कार्यक्रमाच्या तयारीचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. या न भूतो न भविष्यती सोहळ्याला लाखो सेवेकरी व भाविक उपस्थित राहणार आहेत.

या भव्य सोहळ्यात अण्णासाहेब मोरे यांच्या हस्ते सकलकार्य-सिद्धीकारक श्री चक्रराजपूजन व श्री यंत्राचे पूजन होणार आहे. गंगापूर तालुक्यातील धुळे-सोलापूर महामार्गालगत दिवशी गावात हा सोहळा होणार असून, यासाठी सुमारे ४० एकर जागेचा उपयोग करण्यात आला आहे.

कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणावर तयारी सुरू आहे. मराठवाडा प्रतिनिधी विलासराव देशमुख यांच्यासह छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड येथील जिल्हा प्रतिनिधी व सेवेकऱ्यांनी गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांचे सुपुत्र नितीन मोरे यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रमस्थळाची पाहणी केली.

सेवेकऱ्यांना कोणत्याही प्रकारची अडचण येऊ नये यासाठी उत्तम व्यवस्थेची योजना करण्यात आली आहे. कार्यक्रमासाठी भव्य मंडप उभारण्यात येत असून, स्वतंत्र पार्किंगसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे.

बाहेरगावाहून येणाऱ्या महिला व पुरुष भाविकांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहांची व्यवस्था केली जात आहे. तसेच, कार्यक्रमस्थळी पिण्याच्या पाण्याचा नियमित पुरवठा करण्यासाठी नियोजन करण्यात आले आहे. दिवशी गावातील नागरिकांनी सुमारे ३५ ते ४० एकर जमीन विनामोबदला उपलब्ध करून देऊन या सोहळ्याला पाठिंबा दिला आहे. या सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी सात लोकांची समिती स्थापन करण्यात आली आहे.

छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड आणि इतर जिल्ह्यांतून लाखो सेवेकरी व भाविक या सोहळ्यासाठी उपस्थित राहतील अशी अपेक्षा आहे. भक्तिभावाने ओथंबलेल्या या सोहळ्याची तयारी पाहण्यासाठी भाविकांत मोठ्या उत्सुकतेचे वातावरण आहे

## बिअर व देशी दारूचा १४,१०० रुपयांचा साठा जप्त



**सिंदी । रेल्वे**

पोलीस स्टेशन सिंदी रेल्वेच्या पथकाने ९ जानेवारी २०२५ रोजी गुप्त माहितीच्या आधारे सेलडोह गावाजवळील चौरस्त्यावर नाकेबंदी केली. या कारवाईत नागपूर जिल्ह्यातून वर्ध्याकडे जाणाऱ्या एका वाहनात मोठ्या प्रमाणावर बिअर व देशी दारू साठा मिळून आला.

महिला आरोपी राखी मधु कंजरभाट (वय ५५, रा. इतवारा बाजार, कंजरमोहल्ला, वर्धा) हिला ताब्यात घेण्यात आले. तिच्या वाहनातून ९० एम.एल.च्या देशी दारूच्या १०० बाटल्या (एकूण किंमत ७,५०० रुपये), ५०० एम.एल.च्या बिअरच्या २४ कॅन (किंमत ६,००० रुपये), व दोन बॅगा (किंमत ६०० रुपये) असा एकूण १४,१०० रुपयांचा साठा जप्त करण्यात आला.

सदर प्रकरणी गुन्हा क्रमांक ०३/२०२५ अंतर्गत कलम ६५ (ई) आणि ७७ (अ) महाराष्ट्र दारूबंदी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस स्टेशन सिंदी रेल्वेचे कर्मचारी करीत आहेत.

## भद्रावती तालुका पत्रकार असोसिएशन चे अध्यक्षपदी प्रा.विवेक सरपटवार तर सचिवपदी दिलीप मांढरे





**भद्रावती । प्रतिनिधी**

तालुका पत्रकार असोसिएशनच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत भद्रावती तालुका पत्रकार असोसिएशनच्या अध्यक्षपदी प्रा.विवेक सरपटवार तर सचिवपदी दिलीप मांढरे यांची एकमताने निवड करण्यात आली. भद्रावती तालुका पत्रकार असोसिएशनचे ज्येष्ठ पत्रकार के.एस.रावळे यांचे अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. इतर कार्यकारिणी पुढील प्रमाणे उपाध्यक्ष पोमेश्वर टोंगे ,सहसचिव विनायक येसेकर, कोषाध्यक्ष दिलीप ठेंगे, कायदेविषयक सल्लागार ड.मिलिंद रायपुरे, कार्यकारी सदस्य के.एस.रावले, प्रा.सचिन सरपटवार,राजू गैनवार,अतुल कोल्हे,संदीप जिवने,राजेश रेवते,रविकांत वरारकर,निलेश नवराते त्यांच्या निवडीचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

## कोल्हारच्या रक्तदान महायज्ञात ११५ रक्त बॅगांचे संकलन

**कोल्हार । प्रतिनिधी**



जगद्गुरु स्वामी श्री नरेंद्रचार्यजी महाराज संस्थान नानिज यांच्या वतीने सालाबाद प्रमाणे रक्तदान महायज्ञ या सामाजिक उपक्रमाचे आयोजन कोल्हार सेवा केंद्र समिती यांच्यावतीने कोल्हार येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये दिनांक ८ जानेवारी २०२५ रोजी उत्साहात संपन्न झाले. रक्तदान शिबिरास कोल्हार व परिसरातील तमाम नागरिकांनी आपला सहभाग नोंदवून योग्य प्रतिसाद दिला. तुम्ही जगा दुसऱ्याला जगवा या जगद्गुरु श्रींच्या शिकवणीतून रक्तदान महायज्ञाचे महाराष्ट्र व इतर राज्यांमध्ये दरवर्षी आयोजन करण्यात येते, गतवर्षी देखील सुमारे एक लाख रक्त पिशव्यांचे संकलन करण्यात येऊन भारताच्या सीमेवरील जवानांना ते समर्पित करण्यात आले. यासाठी संस्थान 'ब्लड इन नीड 'या सामाजिक उपक्रमांतर्गत सदरचे कार्य चालवत आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन भगवतीपुरदेवालय ट्रस्टचे अध्यक्ष भाऊसाहेब खर्डे यांच्या हस्ते संपन्न झाले याप्रसंगी प्रवरा बँकेचे व्हा. चेअरमन अशोक शेठ असावा देवाला ट्रस्टचे उपाध्यक्ष साहेबराव दळे विश्वस्त विजयराव निबे,प्रवरा बँकेचे संचालक पंढरीनाथ खर्डे राजेंद्र राऊत, दिलीप शेळके,आबासाहेब राऊत अजय खर्डे, आबासाहेब खर्डे गोरख खर्डे, सुनील बोरुडे शिर्डी लोकसभा शिवसेना वैद्यकीय मदत पक्षाच्या प्रमुख सुनिता शेळके,शिवसेना तालुका महिला अध्यक्ष अर्चना निबे आदी उपस्थित होते रक्तदानाचे मानवी जीवनात असलेले महत्त्व आपल्या भाषणात कैलास शिंदे यांनी विशद केले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी रवींद्र लोळगे, सोमेश्वर घोगरे राजू घोटकुले, अशोकराव भवार, बाबासाहेब होन,संदीप सुरासे,ज्ञानेश्वर लांडगे, सोमनाथ येवले, प्रदीप दंडवते, शिवनाथ लोहारकर,अशोकराव गागरे,रिकेश जाधव, बेबीताई आहेर, मंगल भवार,मंगल निबे,जया पठारे सुनीता काशीद,हिराबाई पवार भारती घोटकुले, ज्योती शिंदे आधी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.श्रीकांत बेंद्रे यांनी तर आभार प्रदर्शन केतन लोळगे यांनी केले. दरम्यान एकूण ११५रक्तबॅगांचे संकलन कोल्हार येथील रक्तदान महायज्ञात झाले अशी माहिती सह्याद्रीचा राखणदार या दैनिक वृत्तपत्राचे वार्ताहर गणेश सोमवंशी यांनी दिली

# जिल्हा बँकेची भरती प्रक्रिया पारदर्शकपणे होणार; स्वयंघोषित एजंटा पासून सावध रहा

## जिल्हा बँकेचे अध्यक्ष आ.शिवाजीराव कर्डिले यांचे आवाहन

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

जिल्हा सहकारी बँकेची भरती प्रक्रिया परीक्षेच्या रूपाने आज पासून पुणे या ठिकाणी सुरू झाली आहे .बँकेची भरती प्रक्रिया पारदर्शकपणे व्हावी यासाठीच पुण्यासारख्या ठिकाणी ऑनलाइन सिस्टीमने ही प्रक्रिया पूर्ण होणार असून स्वयंघोषित एजंट पासून परीक्षार्थी व त्यांच्या जवळच्या नातेवाईकांनी सावध राहावे असे आवाहन जिल्हा बँकेचे अध्यक्ष आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी केले आहे.

जिल्हा बँकेसाठी गुरुवार पासून पुणे येथे भरती प्रक्रिया सुरू झाली असून ७०० जागांसाठी सुमारे २८ हजार अर्ज आलेले आहेत. आपल्या मुलाला अथवा मुलीला जवळच्या नातेवाईकाला या भरतीच्या माध्यमातून नौकरी मिळावी म्हणून गेल्या काही दिवसापासून बँकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक यांच्याकडे कार्यकर्ते पदाधिकारी मित्र परिवार नातेवाईक यांची मोठी वर्दळ वाढल्याने बँकेच्या पदाधिकाऱ्यांची देखील यामुळे डोकेदुखी वाढली आहे. यासंदर्भात बँकेचे अध्यक्ष आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी ठोस भूमिका घेत भरती प्रक्रिया संदर्भात सविस्तर भूमिकाच बँकेच्या वतीने मांडली असून विधानसभेच्या निवडणुकीमध्ये कार्यकर्ते हितचिंतक पदाधिकारी तरुण वर्ग सर्वांनीच प्रामाणिकपणे मोठे सहकार्य केले आणि म्हणूनच मोठ्या मताधिक्याने माझा विजय झाला त्याबद्दल सर्वांचे आभारी आहेच परंतु जिल्हा सहकारी बँक आशिया खंडातील सर्वात मोठी बँक असून या बँकेचा पारदर्शक कारभार सुरू आहे त्यामुळे होणारी भरती प्रक्रिया देखील पारदर्शकपणे व्हावी अभ्यासू हुशार गुणवंत विद्यार्थ्यांना या भरती प्रक्रियेच्या माध्यमातून न्याय मिळावा हिच माझी प्रामाणिक इच्छा आहे.



तसेच उमेदवारांना परिक्षा देण्यासाठी पुण्यात जावा लागणार आहे कारण अहिल्यानगर जिल्ह्यात इतक्या उमेदवारांची परिक्षा घेण्याची सर्व तांत्रिक सुविधा उपलब्ध नाहीत. पाहिजे तेवढा परिक्षा घेण्यासाठी कम्प्युटर उपलब्ध नाहीत. त्यांना इथे परिक्षा घेतल्यास काही अडचणी निर्माण होऊ शकतात जसे की लाईट, इंटरनेट कनेक्टिव्हीटी इत्यादी सुविधा पुरेश्या प्रमाणात न मिळाल्यास अडचणी झाल्या असत्या असे कंपनीचे म्हणणे होते, त्यात तथ्य आहे. त्यामुळे या सर्व अडचणी सोडविण्याच्या दृष्टीने पुण्यात परंतु नगरच्या जवळ परिक्षा घेण्याचे नियोजन कंपनी मार्फत केले गेले आहे. पुण्यासारख्या ठिकाणी संबंधित कंपनीच्या माध्यमातून ही भरती प्रक्रिया होणार आहे. ९, १०. ११, १२, १३ व १९ जानेवारीपर्यंत ही परिक्षा पार पाडणार आहे

ही भरती प्रक्रिया पारदर्शकपणे पार व्हावी यासाठी राज्य सरकारने त्यांच्या निकषास पात्र सर्व नियम अटी पुर्ण करणार्या सहा कंपन्यांचा पॅनल तयार करून बँकेस कळविला त्यानुसार बँकेने रितसर शासनाचे मार्गदर्शक सूचनानुसार कोटेशन मागवून त्यातील एका कंपनीला या भरती प्रक्रियेचे कामकाज देण्यात आले. नगर येथे भरती प्रक्रिया पूर्ण करायची म्हटले असते तर शनिवार-रविवार दोनच दिवस शाळांना सुट्टी असतात अशावेळी भरती प्रक्रिया करावी लागली असती त्यामुळे ही भरती प्रक्रिया पुढील अनेक दिवस सुरू राहिली असती. ज्या शिक्षण संस्था उपलब्ध आहेत त्यातील बऱ्याचशा शिक्षण संस्था बँकेच्या संचालक मंडळाशी सलग्न आहेत. त्यामुळे पुन्हा त्या ठिकाणी त्या शिक्षण संस्थेत भरती प्रक्रिया झाली असती तर गैरसमज वाढले असते.

तसेच भरती प्रक्रियेच्या ठिकाणी लाईट जनरेटर सुरक्षा सर्व व्यवस्था वेळेत उपलब्ध असणे देखील महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये बैठकीसह सर्व व्यवस्था त्या ठिकाणी संबंधित कंपनीने केलेली आहे. हुशार अभ्यासू गुणवंत विद्यार्थ्यांना निश्चित पणे या भरती प्रक्रियेमध्ये यश मिळेल असा विश्वास व्यक्त करत बँक भरती प्रक्रियेच्या नावाखाली काही स्वयंघोषित एजंट देखील तयार होतील ठराविक भाव फुटला असे कर्डिले यांनी सांगून त्यांनी पुढे सांगितले की, परीक्षार्थी विद्यार्थी अथवा त्यांच्या नातेवाईकांशी जवळीक साधून त्यांची फसवणूक करू शकतात अशा स्वयंघोषित एजंटापासून परीक्षार्थी विद्यार्थी व त्यांच्या नातेवाईकांनी सावध राहावे.

भरती प्रक्रियेमध्ये कुठल्या प्रकारची वशीलेबाजी होणार नसुन आर्थिक देवाण-घेवाण कोणाशी करू नये असे आवाहन देखील जिल्हा बँकेचे अध्यक्ष आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी यानिमित्ताने केले आहे. त्यांनी शासनाकडे या बाबत मागणी करताना जिल्हा बँकेच्या भरती प्रक्रियेतून बँकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक मंडळ यांना भरती प्रक्रियेपासून चार हात बाजूला ठेवावे. विनाकारण संचालक मंडळाला कुठल्याच प्रकारचा मनस्ताप नको अशा स्वरूपाची देखील मागणी बँक संचालक मंडळाच्या वतीने सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांना पुणे येथे झालेल्या बैठकीच्या वेळी केलेली आहे. बँकेचा कारभार पारदर्शकपणे सुरू आहे, बँकेची भरती प्रक्रिया देखील पारदर्शकपणे व्हावी हा एकमेव प्रामाणिकपणे बँकेचा या मागचा हेतू आहे

मुलाखतीचे पाच गुण देण्यासाठी मुलाखत समिति असणार आहे त्यामध्ये संचालकांचा समावेश देखील नाही. सदर समितीमध्ये सहकार खाते, एम्प्लॉयमेंट, समाज कल्याण, महिला व बालकल्याण, आदिवासी एकात्मिक विकास प्रकल्प इत्यादि विभागाचे अधिकारी तसेच बँकेचे चेअरमन व मुख्य कार्यकारी अधिकारी हे असणार आहेत व ते गुणदान करणार आहे. त्याच प्रमाणे पाच गुण हे उमेदवाराच्या शैक्षणिक पात्रते नुसारचे गुण कशाप्रकारे मिळणार आहे हे देखील जाहिरीतीत स्पष्टपणे नमूद केलेले आहे. सदर समितीमध्ये चेअरमन म्हणून माझा देखील समावेश नको अशी प्रामाणिक भावना आम्ही सहकार मंत्र्यांकडे व्यक्त केली असल्याचे देखील आमदार कर्डिले यांनी यानिमित्ताने सांगितले.

# स्थापलिंग खंडोबा परिसरात विविध विकास कामांचा शुभारंभ

**संगमनेर । प्रतिनिधी**

संगमनेर तालुक्याच्या पठार भागातील अनेक भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या वरवंडी येथील स्थापलिंग खंडोबा देवस्थान यात्रेमध्ये काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी ग्रामस्थ व सर्व भाविकांसमवेत खंडोबारायाची पूजा करत तळी भरून आनंदोत्सवात सहभाग घेतला.यावेळी हायमास्ट सह विविध विकास कामांचा शुभारंभही करण्यात आला.



वरवंडी येथील स्थापलिंग खंडोबा येथे भव्य काठी मिरवणूक काढण्यात आली.याप्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शंकर पाटील खेमनर,कारखान्याचे संचालक इंद्रजीत खेमनर,जि प माजी सदस्या मीरा शेटे, जयराम ढेरंगे यांच्यासह गावातील जेष्ठ नागरिक युवक ग्रामस्थ व पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांनी खंडोबारायाच्या काठी मिरवणूकीत सहभागी घेतला तसेच सर्वांची आराध्य दैवत असलेल्या स्थापलिंग खंडोबाची आरती करून तळी भरली.

यावेळी माजी मंत्री थोरात म्हणाले की, संगमनेर तालुका हा विस्ताराने मोठा आहे. विविध धार्मिक स्थळांसाठी आपण सातत्याने पर्यटन विकास अंतर्गत मोठा निधी उपलब्ध करून दिला आहे. खंडेश्वर, रामेश्वर, निजरनेश्वर, दुधेश्वर, देवगड, याचबरोबर पठार भागातील साकुर मधील विविध गावांसह वरवंडी गावाच्या देवस्थानसाठीही निधी दिला आहे.

सातत्यपूर्ण कामांमुळे गावागावात विकासाच्या योजना राबवल्या गेल्या आहेत आपल्या गावातील सर्वांमधील मतभेद दूर करून सर्वांनी एकत्र यायचे आहे. तालुक्याच्या चांगल्या राजकारणाची व विकासाची परंपरा आपल्याला सुरू ठेवायची आहे.

तर, शंकर पाटील खेमनर म्हणाले की, लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी सातत्याने पठार भागावर प्रेम केले असून अनेक विकासाच्या योजना राबवले आहेत. सरकार कोणाचेही असो तालुक्यातील सर्वसामान्य जनते करता माजी मंत्री बाळासाहेब थोरात हेच सरकार असल्याचे ते म्हणाले.मीरा शेटे म्हणाल्या की, वरवंडी ते स्थापनिंग देवस्थान या रस्त्या करता लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली आपण जिल्हा परिषद योजनेतून निधी मंजूर करून दिला याचे कामही सुरू आहे याचबरोबर या देवस्थानच्या मंदिरासाठी स्वखर्चातून कमाल दिली आहे. यामुळे या पर्यटन क्षेत्राच्या वैभवात भर पडली असल्याचे त्या म्हणाल्या

# नाशिक परिक्षेत्रीय पोलीस क्रीडा स्पर्धा ; ९०० खेळाडूंचा सहभाग



**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

नाशिक परिक्षेत्रीय पोलीस क्रीडा स्पर्धेचे आयोजन अहिल्यानगर पोलीस दलातर्फे आयोजित करण्यात आले आहे. या स्पर्धेत पाच जिल्ह्यातील सुमारे ९०० खेळाडूंनी सहभाग घेतला आहे. यात स्पर्धेत ३०० महिला खेळाडूंचा समावेश आहे. नाशिक परिक्षत्रिय ३५ वी पोलीस क्रीडा स्पर्धा २०२४- २५ अहिल्यानगर, नाशिक ग्रामीण, नाशिक शहर, जळगाव, धुळे, नंदुरबार जिल्ह्याचा समावेश आहे.

या स्पर्धेत कबड्डी, खो-खो, हॉलीबॉल, हँडबॉल, हॉकी, बॉक्सिंग, फुटबॉल, बास्केटबॉल, कुस्ती, तायक्वांदो, वेट लिफ्टिंग, थलेटिक्स, वुशू खेळांचा सहभाग आहे. या स्पर्धा यशस्वीतेसाठी पोलीस अधीक्षक राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, राखीव पोलीस निरीक्षक उमेश परदेशी, पोलीस उपनिरीक्षक व्हिक्टर जोसेफ, सह्हायक पोलीस उपनिरीक्षक शकील शेख यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा सुरू आहेत.

या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ शुक्रवारी ता. १० रोजी मेजर जनरल विक्रम वर्मा, नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक दत्ताराम कराळे यांच्या उपस्थित होणार आहे.

# नेहरू युवा केंद्राच्या वतीने तालुका स्तरीय क्रीडा स्पधेचे आयोजन

**पारनेर । प्रतिनिधी**

युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय भारत सरकार चे नेहरू युवा केंद्र अहिल्यानगर यांच्या सहकार्याने व जिल्हा युवा अधिकारी संकल्प शुक्ला यांच्या मार्गदर्शनाखाली पारनेर येथे तालुका स्तरयीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन दि. क१३ व १४ जानेवारी रोजी क्रीडा संकुल पारनेर येथे करण्यात आले आहे या स्पर्धेत कबड्डी, खो-खो,१०० मीटर धावणे व गोळा फेक अशा मुला मुलींच्या स्पर्धा घेण्यात येनार आहे युवकांच्या मनात विविध खेळ खेळण्याची भावना जागृत व्हावी हा प्रमुख उद्देश या प्रतियोगितेचा आहे तालुकास्तरीय विजेत्यांना ट्रॉफी , प्रमामपत्र देन्यात येनार असुन जिल्हास्तरीय स्पर्धेत खेळण्याची संधी असल्यामुळे जास्तीत जास्त युवकांनी स्पर्धेत सहभागी होण्याचे अव्हाहन नेहरू युवा केंद्र अहिल्यानगर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

NYKS
नेहरु युवा केन्द्र संगठन
Nehru Yuva Kendra Sangathan

**नेहरू युवा केंद्र अहिल्यानगर यांच्या वतीने घेण्यात येणाऱ्या क्रीडा स्पर्धांमध्ये तालुक्यातील सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा व आपले कौशल्य दाखववावे**
**सागर हिंगडे (सामाजिक कार्यकर्ते)**

# रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान:जामखेडमध्ये भव्य महारक्तदान शिबिराचे आयोजन

**जामखेड । प्रतिनिधी**

अनंत श्री विभूषित जगद्गुरू रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज (जगद्गुरू रामानंदाचार्य दक्षिण पीठ नाणीजधाम, ता. जि. रत्नागिरी) यांच्या कृपाशीर्वादाने तसेच पीठाचे उत्तराधिकारी प. पू. कानिफनाथ महाराज यांच्या प्रेरणेने ४ जानेवारी २०२५ ते १९ जानेवारी २०२५ या कालावधीत संपूर्ण महाराष्ट्र आणि इतर राज्यांमध्ये भव्य महारक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

याच पार्श्वभूमीवर जामखेड शहरात रविवार, १२ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ या वेळेत भव्य महारक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. पंचक्रोशीतील सर्व ग्रामस्थांना या शिबिरात सहभागी होऊन रक्तदान करून समाजसेवेचा वसा जपण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

जगद्गुरू माऊलींच्या संकल्पनेनुसार, एक रक्तदान तीन जणांचे प्राण वाचवू शकते. रक्तदानातून गरजूंना नवा जीवदान मिळावा, हीच या उपक्रमामागील प्रेरणा आहे.

याशिवाय, १८ जानेवारी २०२५ रोजी खर्डा येथेही रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.या दोन्ही शिबिरांमध्ये सहभागी होऊन पुण्यसंचय करावा, असे आवाहन जगद्गुरू नरेंद्राचार्यजी महाराज भक्त सेवा मंडळ, जामखेड तालुका यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# मंगलताई पाठक यांचे निधन

**गंगाखेड । प्रतिनिधी**

नगरेश्वर मंदिर जवळील रंगार गल्ली येथील रहिवासी मंगलताई पंडितराव पाठक (वय ६५) यांचे शुक्रवारी, १० जानेवारी रोजी सकाळी ७.२५ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दुपारी २ वाजता गंगाखेड येथील गोदावरी घाट स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाने कुटुंबासह परिसरात शोककळा पसरली आहे.



मंगलताई पाठक यांच्या पश्चात पती, भाऊ, बहिण, दोन मुले, तीन मुली, सुना, आणि नातवंडे असा परिवार आहे. त्या वे.शा.स. पांडुरंग पाठक आणि प्रवीण पाठक यांच्या मातोश्री होत.

# संविधान जागृतीचे चर्चासत्र परभणीत संपन्न

**परभणी । प्रतिनिधी**

स्मृतीशेष लोकनेते विजय वाकोडे आणि शहीद सोमनाथ सूर्यवंशी यांच्या अभिवादन सभेच्या निमित्ताने परभणी येथे भारतीय संविधानाच्या मूल्यांचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी एक दिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन मानव मुक्ती मिशनने केले होते. कार्यक्रमाची सुरुवात स्मृतीशेष विजय वाकोडे आणि शहीद सोमनाथ सूर्यवंशी यांना श्रद्धांजली अर्पण करून करण्यात आली.



या चर्चासत्रात संविधान अभ्यासक आर.एस. यादव (पाथरी) यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निवृत्त तहसीलदार एन.जी. खंदारे होते. प्रमुख पाहुणे म्हणून शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य विठ्ठलराव घुले, लोकराज्य महाविद्यालयाचे प्राचार्य सुनील जाधव, निवृत्त तहसीलदार सारणीकर, शेतकरी नेते इरशाद पाशा पिंपरीकर, आदिवासी विकास परिषदेचे संतोष धोत्रे, निवृत्त शिक्षक लोहट सर, मानव मुक्ती मिशनचे नांदेड जिल्हाध्यक्ष केतन देशमुख, आकाशवाणी केंद्राचे एस.डी. ठोंबरे, अण्णाभाऊ साठे पुतळा समितीचे प्रमुख विश्वनाथ गवारे, कॉम्रेड प्रसाद गोरे, शिवमुद्राचे संस्थापक सूर्यकांत मोगल, मानव मुक्ती मिशनचे संस्थापक नितीन सावंत, राजाभाऊ पवार, अजिंक्य भोसले आणि भारत पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

मार्गदर्शक आर.एस. यादव यांनी सध्याच्या लोकशाहीत राज्यकर्त्यांकडून संविधानिक मूल्यांच्या प्रचारात झालेल्या दिरंगाईमुळे निर्माण झालेल्या समस्या विषद केल्या. त्यांनी महापुरुषांनी सुरू केलेला समतेचा संघर्ष आजही पुढे चालवण्याची गरज अधोरेखित केली.

या चर्चासत्रामुळे संविधानाच्या मूल्यांबाबत जागृती होऊन सामाजिक समता, न्याय आणि स्वातंत्र्य यासंबंधी जनसामान्यांमध्ये महत्त्वपूर्ण चर्चा झाली. उपस्थित मान्यवरांनी या चर्चासत्राच्या आयोजनाचे कौतुक केले आणि संविधानिक मूल्यांचा प्रचार व प्रसार करण्याचा निर्धार व्यक्त केला.

मानव मुक्ती मिशनने या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले असून, संविधान जागृती आणि समाजात सकारात्मक बदल घडविणे, हा या चर्चासत्राचा मुख्य उद्देश होता.

# जि.प.उच्च प्राथमिक शाळा फिस्कूटी येथील विद्यार्थ्यांचे यश






**मुल । प्रतिनिधी**

शैक्षणिक सत्र २०२३-२४ मध्ये झालेल्या पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत अधीरा संजय रामटेके, मिथाली सुरेश आदे, आणि ओम गणेश रस्से या तीन विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

त्याचप्रमाणे, वर्ग पाचवीतील क्रिश मुकुरु निकेसर याची भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा, शासकीय विद्यानिकेतन, केळापूर, जि. यवतमाळ येथे ३७० व्या गुणवत्ता यादीत निवड झाली आहे.या यशाबद्दल मार्गदर्शक शिक्षिका गीता साखरे, शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवृंद, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सदस्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# कोपरगाव तालुक्यातील मोफत विजेच्या लपंडावाने शेतकरी हैराण




**कोपरगाव । प्रतिनिधी**

कोपरगाव तालुक्यातील विज समस्या निर्माण झाली आहे.ऐन रब्बी हंगामात विजेचा लपंडाव सुरू झालेला आहे.रब्बी हंगामात प्रामुख्याने कांदा, गव्हू, हरभरा, भाजीपाला,जनावरांसाठी चारा पिके, ऊस आदी पिके घेतली जातात. ही सर्व पिके संपूर्णत: सिंचनावरच घेतली जातात. सिंचनासाठी आवश्यक आहे विजेची. परंतु विज कमी दाबाने मिळत असल्याने सर्व पिकांना पाणी देण्यासाठी शेतकऱ्यांना खुप त्रास सहन करावा लागत आहे. ढगाळ वातावरणामुळे रब्बी हंगामातील पिके त्यात प्रामुख्याने गव्हू, कांदा, मका,ऊस, भाजीपाला तसेच जनावरांसाठी घास, कडवळ आदी पिकांच्या पेरण्या आधीच उशिराने झाल्या आहेत. त्यामुळे विजेचा वापर मोठ्या प्रमाणावर होत आहे . तरी पण विज उच्च दाबाने मिळत नाही अशी शेतकऱ्यांची तक्रार आहे. रब्बी हंगामातील कांदा लागवडी उशीराने झाल्यामुळे ऐन उन्हाळ्यात जर विजेचा लपंडाव सुरूच राहिला तर पिके कशी जगवायची हा यक्ष प्रश्न शेतकऱ्यांना भेडसावत आहे.थोड्याफार वेळेच्या फरकाने विज बंद करण्यात येते.विजेची जा ये सातत्याने सुरू असल्याने शेतकरी व घरगुती वापर करणाऱ्या ग्राहकांना त्रास सहन करावा लागत आहे. सिंचनासाठी विजेचा अतिशय कमी वापर असताना जर अशी परिस्थिती असेल तर रब्बीतील पेरण्या झाल्यानंतर सिंचनासाठी वीज वापरताना कोणत्या प्रकारचा त्रास शेतकऱ्यांना सहन करावा लागेल याचा विचार संबंधित अधिकाऱ्यांनी केला पाहिजे. शासनाने मोफत वीज देण्याचा निर्णय केला आणि तेव्हापासून विजेचा लपंडाव सुरू झाला जर शासन म्हणत असेल मोफत वीज देऊ तरीही कमी दाबाने व खंडित असणारी वीज शेतकऱ्यांना त्रासदायक ठरणार आहे. काही शेतकऱ्यांनी विजेचा लपंडाव पाहून रब्बी हंगामातील बागायती पिके घेऊन पस्तावा झाला आहे. अनेक गावांमध्ये वीज रोहित्र जळाली तर ती तातडीने बदलून मिळत नाही. विज वितरण कंपनीकडे पुरेसे कर्मचारी नसल्याने एखाद्या खेड्यात विज वितरणात काही बिघाड झाल्यावर कोपरगाव येथील कर्मचारी आल्यावर त्याची दुरुस्ती करण्यात येते त्यासाठी खुप वेळ विज बंद ठेवण्यात येते. त्यामुळे ग्राहकांना मोठा मनःस्ताप सहन करावा लागतो.विज वितरण कंपनीने वीज पुरवठा उच्च दाबाने व अखंडितपणे सुरळीत करण्यासाठी योग्य ती कारवाई तातडीने करणे गरजेचे आहे. अन्यथा एकीकडे शासन मोफत वीज देण्याचा निर्णय जाहीर करताना उच्च दाबाने व अखंडितपणे देऊ शकत नसेल तर शेतकऱ्यांची चेष्टा करत आहे का? हा संतप्त सवाल शेतकरी करतांना दिसत आहे.

# खा. वाकचौरे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यात शुभेच्छांचा वर्षाव

**कोपरगाव । प्रतिनिधी**

शिर्डी लोकसभा मतदार संघातील सर्व सामान्य माणसांच्या व शिवसैनिकांच्या वतीने ४ जानेवारी रोजी खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांचा अभिष्टचिंतन सोहळा शिर्डी येथील हॉटेल साईसंगम मधील प्रशस्त हॉलमध्ये मोठ्या थाटामाटात संपन्न झाला. दुपारी १२ ते ५ वाजेपर्यंत अक्षरशः जनसागर उसळला होता. यावेळी खासदार वाकचौरे यांनी सामान्य जनताच माझी ताकद असून शेवटच्या श्वासापर्यंत जनतेची सेवा करत राहणार असल्याचे उदगार काढले.




सर्वप्रथम उपस्थित संत-महंतांच्या आशीर्वादाने औक्षण करत सर्व कुटुंबियांसमवेत खा.वाकचौरे यांच्या गळ्यात ५१ फूट लांबीचा गुलाबाचा हार टाकून तसेच केक कापून अभिष्टचिंतन सोहळा सुरु करण्यात आला. यानंतर उपस्थित सर्व शिवसैनिक, विविध संस्थांचे पदाधिकारी आणि आम जनतेच्या वतीने शुभेच्छा स्वीकारण्यात आल्या. यावेळी खा.भाऊसाहेब वाकचौरे प्रतिष्ठानच्या वतीने सर्वांसाठी सुरुची भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. आपला माणूस आपल्यासाठी हे ब्रीद घेऊन १५ वर्षांपूर्वी सुरु केलेला प्रवास आजही अखंडित सुरु आहे. खा.वाकचौरे यांचा जनसंपर्क कसा आहे आणि लोकप्रतिनिधी कसा असावा याची प्रचिती आजच्या कार्यक्रमावरून अधोरेखित होते आहे.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी युवा नेते रोहित वाकचौरे, शिवसेनेचे मुकुंद सिनगर, संगमनेरचे भाऊ वाकचौरे, राहात्याचे मिनीनाथ शिंदे, कोपरगावचे अशोक पवार, श्रीरामपूरचे सदाशिव पटारे, नेवासाचे काळू हाटकर यांच्यासह खा.वाकचौरे प्रतिष्ठानचे सर्व सदस्य उपस्थित होते. खा.वाकचौरे यांचे कार्यालयीन प्रमुख गोपाळ सपकार, जनसंपर्कप्रमुख जयराम कदम आदींनी सर्व कार्यकर्त्यांशी संपर्क केला तसेच स्वीय सहाय्य्क शंकरराव सिनगर यांनी कार्यक्रमाचे व्यवस्थापन अतिशय सुयोग्य पद्धतीने केलेले होते तसेच बापूसाहेब यादव, किशोर सोनवणे आदींचे सहकार्य लाभले.सूत्रसंचालन बाळासाहेब सोनवणे यांनी तर मुकुंद सिनगर यांनी सर्वांचे आभार मानले.

# वर्धा जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनीत निरंजन अवथरे यांच्या प्रतिकृतीला प्रथम क्रमांक




**वर्धा । प्रतिनिधी**

मसाळा, वर्धा येथे आयोजित जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनीत लोकमान्य माध्यमिक विद्यालय, दारोडा येथील प्रयोगशाळा परिचर निरंजन अवथरे यांनी सादर केलेल्या बहुउद्देशीय चुलीच्या प्रतिकृतीला प्रथम क्रमांक मिळाला आहे. शिक्षण विभाग, वर्धा यांच्या वतीने अग्रग्रामी कॉन्व्हेंट हायस्कूलमध्ये विज्ञान प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते. निरंजन अवथरे यांनी सादर केलेली बहुउद्देशीय चुली कमी खर्चात तयार करता येते, ती धुराविरहित असून पर्यावरणपूरक आहे. शिवाय ती पेटवणेही अतिशय सोपे असल्याने ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांसाठी उपयुक्त ठरते.या अभिनव संकल्पनेबद्दल निरंजन अवथरे यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. विज्ञानाच्या क्षेत्रातील त्यांच्या या कामगिरीबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# केंद्रीय मंत्री अमित शहा यांची ना.विखेनी घेतली सदिच्छा भेट!

## शिर्डी विमानतळावरून नाईट लॅण्डीग सुरू करण्याची केली विनंती

**शिर्डी । प्रतिनिधी**

केंद्रीय गृह तथा सहकार मंत्री अमित शहा यांची जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांची सदिच्छा भेट घेतली.राज्यात नव्याने स्थापन झालेल्या महायुती सरकार मध्ये मंत्री पदाची संधी मिळाल्यानंतर विखे पाटील यांची पहीलीच भेट होती.शिर्डी विमानतळावरून नाईट लॅण्डीग सुविधा तातडीने सुरू करण्याची तसेच नदीजोड प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करून देण्याची विनंती मंत्री विखे पाटील यांनी केली आहे. डॉ सुजय विखे पाटील याप्रसंगी उपस्थित होते.



मागील अडीच वर्षात महायुती सरकारने सामान्य नागरीकांसाठी यशस्वीपणे राबवलेल्या योजनांना जनतेचे मोठे पाठबळ मिळाले असल्याचे सांगतानाच महसूल व दुग्ध व्यवसाय विकास विभागाने घेतलेल्या महत्वपूर्ण निर्णय व कार्यान्वित झालेल्या योजनांची माहीती मंत्री विखै पाटील यांनी भेटीत झालेल्या चर्चे दरम्यान दिली.

विधानसभा निवडणुकीत महायुतीला मिळालेले यश आणि अहील्यानगर मधील दहा विधानसभा मतदारसंघात मिळालेल्या यशाच्या पार्श्वभूमीवर मंत्री अमित शहा आणि ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्यात सविस्तर चर्चा झाली.या भेटी दरम्यान डॉ.सुजय विखे पाटील उपस्थित होते.

महायुती सरकार मध्ये पुन्हा मंत्री पदाची संधी दिल्याबद्दल ना.विखे पाटील यांनी केंद्रीय मंत्री

अमित शहा यांचे आभार मानथले असून,विश्वनेते पंतप्रधान नरेंद्र मोदी जी यांच्या महत्त्वाकांक्षी आशा नदीजोड प्रकल्पाची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी निधीची उपलब्धता करून देण्याची विनंती मंत्री विखे पाटील यांनी केली आहे. शिर्डी विमानतळावरून नाईट लॅण्डीग सुविधा सुरू करण्याबाबत केलेल्या विनंतीला सकारात्मक प्रतिसाद देवून आजच केंद्रीय सुरक्षा दलाचे मनुष्यबळ उपलब्ध करून देवून पुढील काही दिवसांत नाइट लॅण्डीग सुविधा सुरू करण्याची ग्वाही मंत्री अमित शहा यांनी दिली असल्याचे ना.विखे पाटील यांनी सांगितले.

# वर्धा-पाणी टंचाई आढावा बैठक संपन्न




**वर्धा । प्रतिनिधी**

वर्धा जिल्ह्यातील पाणी टंचाईवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी आज एक महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत, जलजीवन मिशनच्या अंमलबजावणी बाबत चर्चा करण्यात आली. पिण्याचे पाणी प्रत्येक गावातील कुंटुबांना मिळावे, यासाठी जलजीवन मिशन अंतर्गत योजनांची अंमलबजावणी सुरू आहे. तथापि, सेलू तालुक्यातील अनेक गावांमध्ये या योजनेंतर्गत राबवलेली कामे अपूर्ण आहेत आणि काही ठिकाणी त्रुटी आढळून आल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत.

राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी या कामांची गुणवत्ता आणि प्रगती तपासण्यासाठी तालुका स्तरीय समिती गठीत करण्याच्या सूचना दिल्या. त्यांनी याबाबत तातडीने काम करणे आणि संबंधित विभागाने या कामाची विस्तृत पाहणी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले.

जलजीवन मिशनच्या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सर्व स्तरांवर सहकार्य आणि कडी तपासणी आवश्यक आहे, अशी भावना या बैठकीत व्यक्त करण्यात आली.

# झाड लावून वाढदिवस साजरे करा - पद्मश्री राहीबाई पोपेरे

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

रासायनिक खते आणि औषध फवारण्यांनी आपण मातीचे आरोग्य बिघडून टाकले आहे. तेव्हा पुढील पिढ्यांसाठी तरी मातीचे आरोग्य सांभाळणे आवश्यक आहे. पुस्तकातील ज्ञानाबरोबरच निसर्गशाळेतून देखील जीवनास उपयुक्त शिक्षण मिळत असते. त्यामुळे निसर्ग वाचायला व वाचवायला शिकले पाहिजे. पाश्चात्य संस्कृतीप्रमाणे केक कापून वाढदिवस करण्यापेक्षा झाड लावून वाढदिवस साजरे करावेत, असे आवाहन बीजमाता पद्मश्री राहीबाई पोपेरे यांनी केले.



आदर्श गाव वाघोली येथे न्यू आर्टस महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष हिवाळी शिबिराचा शुभारंभ आमदार मोनिका राजळे यांच्याहस्ते संपन्न झाला.

याप्रसंगी प्रमुख अतिथी पद्मश्री पोपेरे बोलत होत्या. जिल्हा- मराठा शिक्षण संस्थेचे सचिव ड.विश्वासराव आठरे पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. जलदूत उमेश भालसिंग, सरपंच सुष्मिता भालसिंग, प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कुंदे, उपसरपंच मोहन गवळी, कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. संदीप मिरे, बापूसाहेब भोसले, विक्रम लांडे, बाबासाहेब गाडगे, डॉ. छाया भालशंकर, ग्रामसेविका जनाबाई फटाले, मुख्याध्यापक प्रमिला गोरे आदी प्रमुख उपस्थित होते.

आमदार राजळे म्हणाल्या , श्रमातून खरे संस्कार निर्माण होत असतात. खेडयाकडे चला ही संकल्पना घेऊन होणाऱ्या या शिबिरातून गावच्या व समाजाच्या विकासासाठी तयार होणारे युवक हे या शिबिराचे खरे यश आहे. युवकांनी उमेश भालसिंग यांच्यासारखी ग्रामविकासाची दृष्टी घ्यावी, असे आवाहन केले. ड.आठरे म्हणाले , जीवनशैली व आहार हे आजाराचे मूळ आहे.

अतिरेकी वागण्यातून माणसाने भविष्यातील पृथ्वीच्या विनाश अटळ करून ठेवला आहे. शिक्षणातून सेवा आणि सेवेतून शिक्षण हे ब्रीद घेऊन विदयार्थी पर्यावरणपूरक राष्ट्रनिर्मितीसाठी तयार व्हावेत. प्राचार्य डॉ पुरुषोत्तम कुंदे यांनी प्रास्तविक केले. प्रा.सोपान नवथर सूत्रसंचालन तर प्रा.डॉ. गोकुळ क्षीरसागर यांनी आभार मानले.

# संगमनेरसाठी इंटरचेंज प्रस्तावित करा ; आमदार सत्यजित तांबे यांची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मागणी

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

संगमनेर नाशिक-पुणे औद्योगिक महामार्गाचे काम लवकरात लवकर तडीस नेण्यासह या महामार्गाच्या रेखांकनात संगमनेर शहरासाठी इंटरचेंज प्रस्तावित करावा व इतर मागण्यांच्या संदर्भात नाशिक पदवीधर मतदारसंघाचे आमदार सत्यजित तांबे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन दिले.

संगमनेर शहरातील अतिक्रमणीत झोपडपट्टी भागात व भाड्याच्या घरात राहणाऱ्या २,५०० कुटुंबांना हक्काचं स्वमालकीचे घर मिळावे,यासाठी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत राज्य व केंद्र शासनाच्या वतीने देण्यात येणाऱ्या अनुदानात वाढ करावी.

संगमनेर रस्ते विकास प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देऊन महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानाअंतर्गत प्रकल्पाच्या प्रस्तावित रकमेस मंजुरी द्यावी आणि शहराच्या विविध भागातील रस्त्यांच्या दुरुस्ती व देखभालीसाठी



अनुदान उपलब्ध करून द्यावे.

संगमनेर शहरातील सर्वच निवासी अनधिकृत बांधकामांवरील १०० टक्के शास्ती कर माफ करून ही सर्व अनधिकृत बांधकामे अधिकृत करण्यासाठी ठोस योजना आणावी.संगमनेर शहराचं नाव ज्या ३ नद्यांच्या संगम ठिकाणावरून पडले, त्या म्हाळुंगी, आढळा आणि प्रवरा या नद्यांच्या सुधार प्रकल्पासाठी संगमनेर नगरपालिकेने तयार केलेल्या ३५० कोटींच्या प्रस्तावास मान्यता द्यावी,असेही या पत्रात म्हटले आहे.

हिवाळी अधिवेशनात हे मुद्दे उपस्थित करून शासनाचे याकडे लक्ष वेधले होते. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भेटून पुन्हा एकदा या प्रमुख मागण्यांसह राज्यातील जनतेच्या हिताच्या इतरही प्रश्नांसंदर्भात सविस्तर चर्चा केली.माझ्या सर्व मागण्या ऐकून घेत त्याविषयी सकारात्मक पावलं उचलली जातील,असा विश्वास त्यांनी दिल्याचे आ. सत्यजित तांबे यांनी सांगितले.

# उन्हाळ्यात पूर्ण क्षमतेने शेतकरी बांधवांना आवर्तन मिळावे

**कोपरगाव । प्रतिनिधी**

चालू पावसाळी हंगामात उशीराने पर्जन्यमान झाल्याने गोदावरी कालवे लाभधारक शेतकऱ्यांना रब्बी व उन्हाळ हंगामाच्या पाण्याच्या आवर्तनात योग्य नियोजन करून देण्यात येणारे आवर्तने पुरेसे क्षमतेने द्यावी म्हणजे त्यामुळे अधिकचे आवर्तन न लागता शेतकऱ्यांच्या पाणीट्टीत बचत होईल.

गोदावरी कालव्यांचे आर्युमान शंभर वर्षापेक्षा जास्त झाले असून, त्याच्या नूतनीकरणासाठी धडक कृती कार्यक्रम हाती घ्यावा, अशी मागणी सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष विवेक कोल्हे यांनी कालवा सल्लागार बैठकीत बोलताना केली.

जिल्हा सहकारी बँकेच्या राहाता शाखेतील सभागृहात जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांच्या अध्यक्षतेखाली बारमाही गोदावरी कालवे लाभधारक कालवा सल्लागार समितीची बैठक नुकतीच पार पडली, त्यात विवेक कोल्हे बोलत होते. तुटीच्या गोदावरी खोऱ्यात पश्चिमेचे समुद्राला अतिरिक्त वाहून जाणारे पाणी पूर्वेकडे वळवावे म्हणून माजीमंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांनी विधिमंडळात मंजुरी घेतली. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत कृष्णा खोऱ्याप्रमाणे कार्यक्रम राबवून नगर-नशिकसह मराठवाडयाच्या प्रादेशिक पाणीवादात शेतकऱ्यांना न्याय द्यावा, असेही ते म्हणाले.

कोल्हे पुढे म्हणाले की, उन्हाळयात तीन आर्वतने दिली तर शेतकऱ्यांना रब्बी हंगामाची ८ हजार ५०० रुपये पाणीपट्टीचा दंड पडतो. तेव्हा आहे त्या पाण्याच्या दोन आर्वतनात बचत करून तिसरे उन्हाळ पाण्याचे आर्वतन दिल्यास शेतकऱ्याच्या पाणीपट्टीत ३ हजार ५०० रुपयांची बचत होणार आहे. उन्हाळ हंगाम आर्वतनाचा कालावधी वाढवावा. कालवा आर्वतन सोडण्यापूर्वी ज्या चाऱ्या, उपचाऱ्या आहे, त्याची दुरुस्ती करावी. गोदावरी कालवे नूतनीकरणाचा प्रश्न अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. उजव्या कालव्यासाठी १९१ कोटींचा निधी मंजूर झाल्याचे समजले, मात्र डाव्या कालव्यास अजून निधीच मंजूर नाही, तेव्हा तो तातडीने उपलब्ध व्हावा. बिगर सिंचन पाण्याचा भार दारणा, गंगापूर धरण कार्यक्षेत्रावर वाढतो आहे. त्याचा फटका बारमाही गोदावरी कालवे लाभधारकांना बसत आहे, त्यासाठी पश्चिमेचे पाणी पूर्वेकडे आणले जावे, असे ते शेवटी म्हणाले.

याप्रसंगी खासदार भाऊसाहेब वाकचौरे, मा.आ.स्नेहलता कोल्हे,आ. आशुतोष काळे, आ. हेमंत ओगले, उत्तर महाराष्ट्र प्रदेश जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता प्रकाश मिसाळ, अधीक्षक अभियंता राजेश गोवर्धने, नाशिक पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता सोनल शहाणे, उजव्या तट कालव्याचे उपअभियंता संभाजी पाटील, डाव्या कालव्याचे उपअभियंता संदीप पाटील, विविध सहकारी पाणीवापर संस्थांचे पदाधिकारी, लाभधारक शेतकरी, सहकारी साखर कारखान्यांचे प्रतिनिधी आदी मोठया संख्येने उपस्थित होते.



# जिल्हा बँकेच्या नोकर भरतीत वशिलेबाजी न करता सरळ भरती करावी परिक्षार्थींनी केली मागणी

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

जिल्हा सहकारी बँकेमध्ये सुमारे ७०० विविध पदांवरील नोकरी भरतीबाबत उद्यापासून परिक्षार्थी उमेदवारांना या परीक्षेसाठी चक्क नगर जिल्हा सोडून थेट पुण्याला जावून परिक्षा द्यावी लागणार आहे.

तरीही परिक्षार्थी उमेदवारांची घरची मंडळी तसेच नातलगांकडून आपल्या उमेदवाराची जिल्हा बँकेत वर्णी लागण्यासाठी पडद्या - आडून फिल्डिंग लावून सोंगट्या फिरविण्यासाठी वशिलेबाजीचे सुत कुठे काही जमते का? याचा कोनोसा सध्या परिक्षार्थी उमेदवारांचे नातलग मंडळी सध्या घेताना दिसून येत आहेत.

या जिल्हा बँक भरतीमध्ये वशिलेबाजी न होता सरळ भरती प्रक्रिया राबवावी अशी अपेक्षा सध्या अनेक परिक्षार्थींकडून होतांना दिसून येत आहे.




अहमदनगर (अहिल्यानगर) जिल्हा सहकारी बँक भरती प्रक्रियेतील घोटाळे थांबविण्यासाठी ही प्रक्रिया सध्या जिल्हा बँकेने ऑफलाइनऐवजी ऑनलाइन करण्याचे धोरण स्विकालेले आहे.

या भरती प्रक्रियेसाठी सहा कंपन्यांचे पॅनल गठित केलेले असून मात्र या पॅनलमध्येच घोटाळा होण्याची शक्यता परिक्षार्थींकडून सध्या व्यक्त होताना दिसून येत असून अनुभवाची बोगस प्रमाणपत्रे सादर केली जाण्याची शंका सध्या परिक्षार्थींकडून दबक्या आवाजात चर्चिली जात आहे. जिल्हा सहकारी बँकेच्या भरती प्रक्रियेत वशिलेबाजी न होता सरळ भरती होवून परिक्षार्थींचे थेट बँकेत नेमणूक व्हावी अशी अपेक्षा परिक्षार्थींकडून होत आहे.

तर राजकारणाशी निगडित असलेल्या नातेवाईकांनी आपल्याच पाल्याची वर्णी थेट जिल्हा बँकेत लागण्यासाठी राजकीय कोनोसा घेवून वशिलेबाजीच्या सोंगट्या फिरविण्यासाठी त्यांच्याकडून सारिपाट आखला जात असल्यामुळे सर्वसामान्य उमेदवार मात्र या बाबींचा कानोसा घेवून आपली या जिल्हा बँकेत बिगर वशिलेची खरच वर्णी लागेल काय? या विवंचनेत सध्या अनेक परिक्षार्थीचे लक्ष लागेल आहे. त्यामुळे जिल्हा बँकेच्या नोकर भरतीकडे सध्या अनेकांचे लक्ष लागून आहे.

# केळझर येथे संत हजरत पिरबाबा यांचा उर्स शरीफ ११ जानेवारीला



**सिंदी (रेल्वे) । प्रतिनिधी**

सेलु तालुक्यातील केळझर येथील हजरत पिरबाबा वली रहेमतुल्ला दर्गाह कमेटिद्वारे शनिवार दिनांक ११ जानेवारीला सर्वधर्म समभाव संत हजरत पिरबाबा उर्फ टेकडिवाले बाबा यांचा उर्स शरीफ साजरा करण्यात येणार आहे. या उत्सवात विविध धार्मीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

दरवर्षीप्रमाणे समितीच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. उत्साहात दर्गाह कमेटि केळझर व गावातील समस्त भाविकांच्या उपस्थित चादर चढविण्यात येणारआहे. तर सायंकाळी ६ वाजता दर्शनासाठी येणार्या भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन हजरत पिरबाबा वली दर्गाह समितीच्या वतीने करण्यात आले आहे. तसेच या कार्यक्रमाला भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहुन महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन अध्यक्ष डॉ. ईर्शाद शेख सचिव करिम शेख व कमेटिने केला आहे. केळझर येथील पिरबाबा प्रसिध्द दर्गाह आहे. हिंदु मुस्लीम व सर्व जाती धर्माच्या भाविकांची श्रध्दा असुन दररोज भाविक मोठ्या याठिकाणी संख्येने दर्शनासाठी येतात. तसेच उर्स शरीफ मध्ये गावातील व बाहेर गावातील भाविकांची दर्शनासाठी गर्दी असते.

# नगरविकासासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांचा आढावा; १०० दिवसांत योजना राबविण्याचे निर्देश

**मुंबई । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नगरविकास विभागामार्फत येत्या १०० दिवसांत करावयाच्या कामे आणि उपाययोजनांबाबत मंत्रालयात आढावा घेतला. या बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, मुख्य सचिव सुजाता सौनिक आणि अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्यातील ४२३ शहरांमधील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी सर्व अत्यावश्यक आणि दर्जेदार सोयी-सुविधा उपलब्ध करून देऊन या शहरांचा सर्वांगीण विकास करण्याचे उद्दिष्ट ठेवण्याचे निर्देश दिले. त्यांनी वाढत्या शहरीकरणाला सामोरे जाताना नागरिकांना दर्जेदार सेवा पुरविण्यावर भर देण्याचे महत्त्व अधोरेखित केले.




मुख्यमंत्री फडणवीस यांनी शहरांमध्ये सांडपाणी व्यवस्थापनाला प्राधान्य देऊन त्याच्या पुनर्वापरासाठी पारदर्शक धोरण निश्चित करण्याचे निर्देश दिले. तसेच घनकचरा व्यवस्थापनासाठी निधी उपलब्ध करून देताना ही बाब अनिवार्य करण्याची सूचना केली सर्व नगरपरिषदांमधील मालमत्ता कर निर्धारणासाठी जीआयएस प्रणालीचा उपयोग करताना नियोजनबद्ध सुधारणा करण्याचे निर्देश देण्यात आले. या प्रक्रियेत नागरिकांवर एकाचवेळी मोठा कर भार येणार नाही, याची दक्षता घेण्याचे त्यांनी सांगितले.

राज्यातील शहरीकरणाच्या झपाट्यात नागरिकांचे जीवनमान उंचावण्याचा आणि शहरी भागांचा अधिक प्रभावीपणे विकास साधण्याचा दृष्टिकोन या बैठकीत स्पष्ट करण्यात आला.

# देव्हाडीतील रेल्वे फाटका जवळ तरुणीचे अपहरण

**भंडारा । प्रतिनिधी**

तुमसर - देव्हाडी येथील गांधी वॉर्डमध्ये राहणाऱ्या अनुपकुमार सिताराम मिश्रा (वय ४९) यांनी आपल्या मुलीच्या अपहरणाची फिर्याद पोलिसांत नोंदवली आहे. आरोपी प्रशांतचंद राजपूत उर्फ मकालु (वय अंदाजे २५) आणि त्याच्यासोबतचे दोन अनोळखी इसम, हे सर्व देव्हाडी गावातील असून वेगवेगळ्या समाजाचे रहिवासी आहेत.

फिर्यादींची मुलगी मुस्कान अनुपकुमार मिश्रा (वय २४) हिने ८ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता आपल्या मैत्रिणीसोबत स्कुटीवरून देव्हाडी येथील टेलरकडे ब्लाउज आणण्यासाठी प्रवास केला. ब्लाउज घेऊन परत येत असताना रेल्वे फाटकाजवळ थांबल्या असता, आरोपी



प्रशांतचंद आणि त्याच्या सोबत असलेल्या दोन अनोळखी इसमांनी मुस्कान हिला जबरदस्तीने चारचाकी वाहनात टाकून पळवून नेले. या घटनेनंतर अनुपकुमार मिश्रा यांनी तातडीने पोलिसांत तक्रार दिली. तुमसर पोलिसांनी अप. क्र. ०८/२०२५ अंतर्गत भारतीय दंड संहितेच्या कलम ८७(३)(५) नुसार गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कोल्हे करीत आहेत. या घटनेमुळे देव्हाडी परिसरात खळबळ उडाली असून पोलिसांनी आरोपींच्या शोधासाठी विशेष पथक नियुक्त केले आहे.

# शिर्डीत एम्सच्या धर्तीवर रुग्णालय, वैद्यकीय महाविद्यालय सुरू करावे: डॉ.राजेंद्र पिपाडा यांची मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे मागणी

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

श्रीसाईबाबा संस्थानच्या हॉस्पिटलमध्ये विदर्भ व मराठवाड्यातून मोठ्या प्रमाणावर रुग्ण येत असून आयसीयू बेड व जागा कमी पडत आहेत. त्यामुळे शिर्डीमध्ये दिल्लीतील एम्सच्या धर्तीवर सुसज्ज असे रुग्णालय तसेच संलग्न शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजूर होऊन हॉस्पिटलचे विस्तारीकरण व्हावे, या आशयाचे निवेदन डॉ. राजेंद्र पिपाडा यांनी मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले.

शिर्डी येथील श्रीसाईबाबा संस्थान रुग्णालयात उपचार घेण्यासाठी राज्यातील विविध भागातून रुग्ण येतात. विशेष करून मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील रुग्ण मोठ्या प्रमाणात या रुग्णालयांत उपचार करून घेण्यासाठी येतात. सद्यस्थितीत शिर्डी येथील श्रीसाईबाबा रुग्णालयात उच्च शिक्षित डॉक्टर, प्रशिक्षित तंत्रज्ञ तसेच मुलभूत सोई-सुविधांचा आणि आधुनिक यंत्र सामुग्रीचा अभाव आहे. त्यामुळे रुग्णांवर आवश्यक उपचार करणे रुग्णालयांच्या आवाक्याबाहेर झाले. त्यामुळे या रुग्णालयाचा मोठा विस्तार आणि विकास करून रुग्णालयात आधुनिक तंत्रज्ञान व यंत्रसामुग्रीद्वारे उत्तम उपचार पद्धतीचा वापर करणे आवश्यक आहे. श्रीसाईबाबा रुग्णालयात कॅन्सर आणि बर्निंगसारखे नवीन विभाग सुरू करणे आवश्यक आहे. कारण, अशा आजारांवर योग्य उपचार



करण्यासाठी येथे दुसरे चांगले रुग्णालय नाही. मराठवाड्यातील गरीब रुग्णांना मुंबई आणि पुण्यासारख्या ठिकाणी महागडे उपचार करून घेणे शक्य होत नाही. परिणामी रुग्णांचे उपचाराअभावी मृत्यू होतात. श्रीसाईबाबा संस्थानच्या रुग्णालयात सोनोग्राफी सेंटर डॉक्टरांअभावी बंद आहे. एमआरआय, सीटीस्कॅनसाठी तीन-तीन महिन्याच्या तारखा दिल्या जातात. अपघात किंवा हृदयविकाराचा झटका अशा रुग्णांकडे कॅज्युल्टीत लक्ष दिले जात नाही. बेड उपलब्ध नसल्याचे कारणे सांगून पेशंट बाहेर पाठवले जातात. शिर्डी संस्थानचे सुपर हॉस्पीटल नव्हे, तर रेफर हॉस्पीटल झाले, असे वाटू लागले, असेही डॉ. पिपाड यांनी निवेदनात नमूद केले आहे.

# विवेकानंद केंद्राच्या वतीने रविवारी युवा दिनानिमित्त व्याख्यान व सत्कार



**वर्धा । प्रतिनिधी**

विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी शाखा वर्धा आणि स्व. सत्यनारायण बजाज सार्वजनिक जिल्हा ग्रंथालयाच्या संयुक्त विद्यमाने स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त युवा दिनाचे औचित्य साधून रविवारी, १२ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजता सत्यनारायण बजाज वाचनालय सभागृहात व्याख्यान व सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमात वर्धेचे सुपुत्र व मेळघाट येथील महान ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. आशिष सातव यांचा सत्कार करण्यात येईल. तसेच विवेकानंद केंद्राचे महाराष्ट्र प्रांत सहसंघटक सुमित शिवहरे युग प्रवर्तक स्वामी विवेकानंद या विषयावर व्याख्यान देतील.विवेकानंद केंद्राच्या वतीने या कार्यक्रमास नागरिकांनी सहकुटुंब उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. स्वामी विवेकानंद यांच्या विचारांवर आधारित हा कार्यक्रम युवकांसाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

# भंडारदऱ्याच्या पर्यटन विकासासाठी आमदार सत्यजीत तांबेंचा सातत्यपूर्ण पाठपुरावा

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अकोले तालुक्यातील भंडारदरा धरणाला २०२६ साली शंभर वर्षे पूर्ण होणार आहेत. या शतकपूर्तीच्या निमित्ताने भंडारदरा परिसराचा पर्यटनदृष्ट्या विकास करण्यासाठी व तेथील पर्यटकांना जलसंपदा व धरणाविषयी माहिती देणारे 'वॉटर म्युझियम' उभारावे, असा प्रस्ताव आमदार सत्यजीत तांबे यांनी राज्य सरकारला दिला आहे.

यासंदर्भात तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली होती. बैठकीत पर्यटनाचा आराखडा तयार करण्यासाठी तसेच जलसंपदा व पर्यटन विभागामध्ये सामंजस्य करार करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, करारावर अद्याप स्वाक्षऱ्या झाल्या नसल्यामुळे आमदार तांबेंनी पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांची भेट घेऊन त्यांना निवेदन सादर केले आहे.

आ. सत्यजीत तांबे यांनी मागणी केली आहे की, भंडारदऱ्याच्या शतकपूर्ती निमित्ताने जलसंपदा व पर्यटन विभागाने सामंजस्य करार पूर्ण करून त्याची अंमलबजावणी करावी. तसेच 'वॉटर म्युझियम' उभारण्यासाठी लागणारी जागा निश्चित करावी. भंडारदरा धरणाच्या शतकपूर्तीच्या निमित्ताने विविध सांस्कृतिक व शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे. यासाठी आवश्यक निधी मंजूर करण्याची विनंतीही त्यांनी केली आहे.



भंडारदरा येथे वॉटर म्युझियम उभारण्यासाठी आ. सत्यजीत तांबे सातत्याने प्रयत्नशील आहेत. यासाठी त्यांनी यापूर्वी तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून मागणी केली होती. सप्टेंबर २०२४ मध्ये फडणवीस यांचे सचिव श्रीकर परदेशी तसेच जलसंपदा व पर्यटन विभागाचे वरिष्ठ अधिकारी आणि महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठकही पार पडली होती.

हिवाळी अधिवेशनात देखील तांबेंनी ही मागणी लावून धरली. त्यांच्या मते, भंडारदरा धरणाच्या शतकपूर्ती निमित्ताने जागतिक पर्यटन आकर्षित करण्यासाठी हे उपक्रम अत्यंत महत्त्वाचे ठरतील. यामुळे पर्यटन वाढीस चालना मिळेल आणि जिल्ह्याचा विकास साधता येईल.

# तालुका पातळीवर कृषी प्रदर्शन भरविण्याची गरज - कृषीमंत्री ॲड.माणिकराव कोकाटे

## कृषीमंत्र्यांच्या हस्ते अकोले येथे कळस कृषी व डेअरी प्रदर्शनाचे उद्घाटन

**शिर्डी । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांचे प्रबोधन करण्यासाठी स्थानिक युवकांनी एकत्र येत तालुका पातळीवर कृषी प्रदर्शन भरविण्याची गरज आहे, अशा प्रदर्शनांना शासनाकडून सर्वतोपरी सहाय्य केले जाईल, असे प्रतिपादन राज्याचे कृषीमंत्री ड. माणिकराव कोकाटे यांनी केले. अकोले येथे आयोजित कळस कृषी व डेअरी प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, सामाजिक कार्यकर्ते दिलीपराव शिंदे, द्राक्ष बागायतदार संघटनेचे कैलासराव भोसले, आबासाहेब थोरात, कपिल पवार, पाणी फाऊंडेशनचे अविनाश पोळ, कळस कृषी प्रदर्शन समितीचे सागर वाकचौरे, संदीप वाकचौरे, नामदेव मिसाळ आदी उपस्थित होते.

कृषीमंत्री श्री.कोकाटे म्हणाले, आतापर्यंत कृषी अवजारांची प्रदर्शने पाहिली आहेत. आज प्रथमच प्रत्यक्ष पीकांच्या शेतीसह असलेले प्रदर्शन पहात आहे. कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून तरूणांना शेतीमध्ये




नवनवीन प्रयोग करण्याचे ज्ञान प्राप्त होते. आज महाराष्ट्रात एका पीकांचे वेगवेगळे २०० प्रकारांच्या वाणांचे संशोधन झाले आहे. कृषी विभागाच्या योजनांचा लाभ थेट शेतकऱ्यांच्या खात्यात मिळाला पाहिजे यावर शासनाचा भर आहे. योजनांच्या अंमलबजावणीत पारदर्शकता आली पाहिजे यासाठी तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. तरूणांना शेती क्षेत्राकडे वळविण्यासाठी कृषी क्षेत्रात नवनवीन प्रयोग करण्याची गरज आहे. शेतकऱ्यांनी पारंपरिक खत व बियाणे न वापरता, प्रमाणित केलेली खते व बियाणे अधिकृत विक्रेत्यांकडूनच खरेदी केली पाहिजेत, असे आवाहनही त्यांनी केले.

शेतकऱ्यांनी नकारात्मक होऊन खचून जाऊ नये, शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. कार्यक्रमानंतर ,कृषीमंत्र्यांनी प्रदर्शनातील विविध स्टॉलला भेट देत पिकांच्या नवनवीन वाणांची माहिती जाणून घेतली.

# संगमनेर तालुका व शहरातील अवैध फ्लेक्स तातडीने काढावेत; आंदोलनाचा इशारा

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

संगमनेर शहर व तालुक्यात विशिष्ट राजकीय पक्षांचे व त्यांच्या पदाधिकाऱ्यांचे फ्लेक्स हे अनाधिकृत व अधिकृत वेळेच्या मर्यादेपेक्षा जास्त वेळ ठेवले गेले आहेत.प्रशासनाकडून याबाबत दुर्लक्ष होणे हे हे अत्यंत चुकीचे असून संगमनेर शहरामध्ये मुख्याधिकारी व तालुक्यामध्ये पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी तातडीने सूचना देऊन हे सर्व फ्लेक्स त्वरित काढावेत अन्यथा शिवसेना स्टाईलने आंदोलन करण्यात येईल असा खणखणीत इशारा शिवसेना नेते अमर कतारी यांनी दिला आहे.



उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे अमर कतारी यांनी दिलेल्या निवेदनात पुढे म्हटले आहे की,निवडणुका झाल्यानंतर अनेक दिवसांपासून काही पक्षांच्या व त्यांच्या कार्यकर्त्यांचे फ्लेक्स अनेक दिवसांपासून संगम नेर बस स्थानक परिसर व संपूर्ण शहरांमध्ये आहे.याला कोणतेही परवानगी नाही.किंवा परवानगीच्या मुदतीत संपून गेलेल्या आहेत.मात्र प्रशासनाने त्यावर अद्याप कोणतेही कारवाई केलेली नाही.याचप्रमाणे तालुक्यातील अनेक गावांमध्ये सर्व फ्लेक्स अनाधिकृत व वेळेच्या मर्यादा पेक्षा जास्त काळ ठेवलेले आहेत.या वेळेच्या मर्यादा व त्या शुल्काबाबतची जबाबदारी ही संबंधित ग्रामसेवकांची आहे.मात्र ग्रामसेवक याकडे दुर्लक्ष करत आहेत.यामुळे या फ्लेक्स ची दुरावस्था होऊन सामाजिक मतभेद वाढू शकतात.अनेक दिवसांचे फ्लेक्स असल्याने काही ठिकाणी फाटले आहेत किंवा काही खराब झाले आहेत.त्यामुळे राजकीय वातावरण सुद्धा अस्थिर होऊन वाद निर्माण होतील. इंजिनिअरिंग कॉलेज ते संगमनेर बस स्थानक या मुख्य रस्त्यावर एका विशिष्ट पदाधिकाऱ्याचे अनाधिकृत फ्लेक्स आहेत.इतके दिवस फ्लेक्स कसे राहू शकतात असा प्रश्न विचारताना हा नियम सर्वांना सारखा आहे का आणि दुसरे असे याचे शुल्क भरलेले आहेत का? हाही खुलासा होणे गरजेचे आहे.तरी तातडीने महामार्गावरील सर्व अनाधिकृत फ्लेक्स,बस स्थानकाजवळ असलेले फ्लेक्स तसेच अनेक गावांमध्ये खूप दिवसांपासून लावले गेलेले फ्लेक्स हे दोन दिवसांमध्ये तातडीने काढण्यात यावे.अन्यथा शिवसेना उद्धव बाळा साहेब ठाकरे पक्षाच्या वतीने भव्य आंदोलन करण्यात येईल.याचबरोबर या अस्थिर होणाऱ्या परिस्थितीला नगरपरिषदेचे मुख्याधिकारी,महामार्गाचे अधिकारी त्याचप्रमाणे पंचायत समितीचे गटविकास अधिकारी जबाबदार असतील.तरी त्यांनी तातडीने गावांमधील ग्रामसेवक व शहरातील संबंधित अधिकाऱ्यांमार्फत हे अनाधिकृत फ्लेक्स त्वरित काढले पाहिजेत असेही त्यांनी म्हटले आहे.

# ईज ऑफ लिव्हिंगसाठी सात कलमी कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करा–जिल्हाधिकारी वान्मथी सी

**वर्धा । प्रतिनिधी**

सामान्य नागरिकांचे जीवन सुकर करण्यासाठी राज्य सरकारने सात कलमी कृती कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या कार्यक्रमाची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्व शासकीय विभागांनी नियोजनबद्ध आणि समन्वयाने काम करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी दिल्या.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ईज ऑफ लिव्हिंग संकल्पनेच्या अनुषंगाने आयोजित बैठकीत जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी शासकीय विभागांना नागरिकांच्या सुविधेसाठी प्रलंबित कामे निकाली काढण्याचे आणि सुधारणा राबविण्याचे निर्देश दिले.

या कृती कार्यक्रमाचा आढावा १५ एप्रिल २०२५ रोजी घेतला जाणार आहे. यासाठी प्रत्येक विभागाने आपल्या संकेतस्थळांना अद्ययावत करणे, माहिती अधिकारांतर्गत माहिती ऑनलाइन उपलब्ध करणे, सायबर सुरक्षेसाठी उपाययोजना करणे, आणि कार्यालयांमध्ये स्वच्छता मोहीम राबवून अनावश्यक कागदपत्रे हटविणे यांसारखी कामे प्राधान्याने करावी, असे जिल्हाधिकारी म्हणाल्या.प्रत्येक विभागाने नागरिकांच्या सोयीसाठी किमान दोन सुधारणा किंवा नाविन्यपूर्ण उपक्रम राबवावे, तसेच लाभार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेत आवश्यक सुधारणा कराव्यात. शाळा, अंगणवाडी, आणि आरोग्य केंद्रांना भेटी देऊन तेथील सुविधांचा आढावा घेण्याचाही सल्ला त्यांनी दिला.जात प्रमाणपत्र, नझुल पट्टे वाटप, प्रॉपर्टी कार्ड, जमीन मोजणी, प्रलंबित तक्रारींचे निवारण, आणि शासकीय योजनांच्या अंमलबजावणीसाठी सुलभ व्यवस्था निर्माण करणे यावर भर देण्यात आला आहे. दर शुक्रवारी स्वच्छता मोहीम राबवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.मुख्यमंत्री फडणवीस यांच्या मार्गदर्शनानुसार ईज ऑफ लिव्हिंग कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी प्रशासन सज्ज असून, नागरिकांचे जीवन सुकर करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी सांगितले.



## म्हसणे फाटा टोलनाक्यावर २० जानेवारीला टोल बंद

# पत्रक वितरण आंदोलन नारायणगव्हाण चौपदरीकरणासाठी ग्रामस्थांचा लढा

**पारनेर । प्रतिनिधी**

नगर–पुणे महामार्गावरील नारायणगव्हाण येथील चौपदरीकरणाच्या कामाला विलंब होत असल्यामुळे गावकऱ्यांनी २० जानेवारी रोजी म्हसणे फाटा टोलनाक्यावर टोल बंद पत्रक वितरण आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रशासनाच्या दिरंगाईचा निषेध करत ग्रामस्थ आणि सामाजिक कार्यकर्ते सचिन शेळके यांनी हे आंदोलन जाहीर केले आहे.



सार्वजनिक बांधकाम विभागाने भूमी अभिलेख कार्यालयाकडे मोजणीचे शुल्क जमा केले असले, तरी अद्याप मोजणीचे काम सुरू झालेले नाही. यामुळे गावकऱ्यांच्या आणि प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर झाला आहे. वेळोवेळी तहसील कार्यालय, उपजिल्हाधिकारी, आणि जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे. ग्रामस्थांनी यापूर्वी रास्ता रोको, धरणे आंदोलन, उपोषण, आणि तहसील कार्यालयावर लोटांगण आंदोलन केले. मात्र प्रशासनाने याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले असल्याचे सामाजिक कार्यकर्ते शरद पवळे यांनी सांगितले. गावकऱ्यांनी सुरुवातीपासून प्रशासनाला सहकार्याची भूमिका घेतली आहे, मात्र प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे आज आम्हाला रस्त्यावर उतरावे लागत आहे, असे पवळे म्हणाले.

चौपदरीकरणाचे काम सुरू न झाल्यास म्हसणे फाटा टोलनाक्यावर २० जानेवारी रोजी टोल बंद पत्रक वितरण आंदोलन करण्यात येईल, असा इशारा सामाजिक कार्यकर्ते सचिन शेळके यांनी दिला आहे. अपघात टाळण्यासाठी आणि प्रवाशांच्या सुरक्षेसाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी मागणी त्यांनी केली.

महामार्गावर शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, आणि प्रवाशांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. प्रशासनाने चौपदरीकरणाचे काम तातडीने सुरू करावे, अन्यथा ग्रामसुरक्षेसाठी कठोर पावले उचलली जातील, असे शेळके म्हणाले.

# शिक्षण प्रणालीत सुधारणा करण्यासाठी शिक्षक व पालकांनी सक्रिय सहभाग घ्यावा–डॉ.पंकज भोयर

**वर्धा । प्रतिनिधी**

शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल होत असून प्रत्येक विद्यार्थ्याला दर्जेदार शिक्षण मिळावे, यासाठी शासन प्रयत्नशील आहे. शिक्षण प्रणालीतील सुधारणांसाठी शिक्षक व पालकांनी योग्य सूचना कराव्यात, असे आवाहन राज्याचे शालेय शिक्षण, गृह (ग्रामीण), सहकार, खनिकर्म व गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी केले.

बोरगाव मेघे येथील स्व. आनंदराव मेघे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात आयोजित तालुका स्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेच्या उद्धाटनप्रसंगी डॉ. भोयर बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक संजय भूते होते. प्रमुख अतिथी म्हणून गट शिक्षणाधिकारी डॉ. धर्मपाल कुमरे, शिक्षण विस्तार अधिकारी श्री. परमार यांसह इतर मान्यवर उपस्थित होते.



नवीन पिढी घडवण्यासाठी शिक्षकांचे योगदान महत्त्वाचे राज्यमंत्री भोयर म्हणाले, शिक्षक हे भावी पिढी घडविण्याचे कार्य करतात. विद्यार्थ्यांमध्ये चांगले संस्कार व आदर्श रुजवण्यासाठी शिक्षकांची भूमिका महत्त्वाची आहे. शिक्षण प्रणालीतील अडचणी दूर करण्यासाठी शिक्षक आणि पालकांनी सूचना दिल्यास त्या सूचनांवर आधारित सुधारणा करण्यात येतील. स्पर्धांच्या महत्त्वावर भर देताना त्यांनी विद्यार्थ्यांनी अशा उपक्रमांमध्ये सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांचे सुप्त गुण उलगडतात, तसेच स्पर्धेतील उत्कृष्ट खेळाडूंना जिल्हा स्तरावरील स्पर्धांसाठी निवडले जाईल, असेही ते म्हणाले.मेघे विद्यालयाने बँड पथक आणि म्युझिक लॅबची मागणी केली असून ती लवकरच पूर्ण केली जाईल, असे आश्वासन डॉ. भोयर यांनी दिले. म्युझिक लॅबचा लाभ केवळ शाळेतील विद्यार्थ्यांनाच नव्हे, तर गावातील मुलांनाही मिळावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.कार्यक्रमाला तालुक्यातील विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुलगावकरांचे ऋण फेडण्याचा निर्धार – आ.राजेश बकाने

**पुलगाव । प्रतिनिधी**

पुलगावकरांनी निवडणुकीच्या काळात मतदानरूपाने दिलेले प्रेम आणि भव्य नागरी सत्काराने व्यक्त केलेला सन्मान हे ऋण मी पुलगावचा सर्वांगीण विकास करून नक्कीच फेडेन, असे भावपूर्ण उद्गार पुलगाव–देवळी विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजेश बकाने यांनी व्यक्त केले. स्थानिक पंडित दीनदयाळ उपाध्याय चौकात पुलगाव शहरातील ४० संघटनांच्या वतीने या नागरी सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रसिद्ध वकील ॲड. दिनेश शर्मा यांनी भूषवले. भाजप ओबीसी मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष संजय गाते, माजी खासदार रामदास तडस, सकल कुणबी समाजाचे अध्यक्ष प्रशांत डफळे, व्यापारी नेते अत्तरचंद खत्री, भाजप शहराध्यक्ष नितीन बडगे, ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मंगेश झाडे, प्रदेश कार्यकारणी सदस्य राजीव बत्रा यांसारख्या मान्यवरांची उपस्थिती लाभली.कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व भारतमाता पूजनाने झाली. फटाक्यांची प्रचंड आतषबाजी व तुतारीच्या निनादात पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी आ. बकाने यांनी पुलगाव शहरातील विविध समस्या सोडवण्यासाठी आणि विकासात्मक प्रकल्प राबवण्यासाठी आपल्या संकल्पाचा पुनरुच्चार केला.



आ. राजेश बकाने यांनी आपल्या भाषणात पुलगाव ग्रामीण रुग्णालयाला उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा मिळवणे, पुलगाव नगरपरिषदेची हद्दवाढ करून नाचनगाव व गुंजखेडा यांना समाविष्ट करणे, पुलगाव–अमरावती जोडणाऱ्या नदीवरील पुलाचा ३५ कोटींचा प्रस्ताव, तसेच गुंजखेडा व हिवरा रसूलाबाद येथे अंडरपास बांधण्यासाठी १०० कोटींचा निधी मंजूर करण्याचा मानस व्यक्त केला. याशिवाय, पुलगाव कॉटन मिलचे कापड मिलमध्ये रूपांतर करून स्थानिक युवकांना रोजगार उपलब्ध करून देण्याचेही त्यांनी आश्वासन दिले. मी मतदारसंघातील कोणत्याही मतदाराला पश्चातापाची वेळ येऊ देणार नाही, असे ते म्हणाले.आ. बकाने यांचा २० फुट लांबीच्या पुष्पहाराने क्रेनच्या साहाय्याने सत्कार करण्यात आला. फटाक्यांची आतषबाजी व तुतारीच्या गजरात झालेला हा सत्कार पुलगाव–देवळी विधानसभेत पहिल्यांदाच कोणत्याही आमदारासाठी आयोजित करण्यात आल्याची चर्चा नागरिकांमध्ये होती.कार्यक्रमात पुलगाव पोलिस उपविभागीय अधिकारी राहुल चव्हाण, भाजपा जिल्हा महामंत्री राहुल चोपडा, संदीपसिंग ठाकुर, आकाश दुबे आदींची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आकाश दुबे यांनी केले, तर यशस्वीतेसाठी अरविंद भार्गव, मनोज वालादे, शिल्पा ठाकूर व इतरांनी विशेष परिश्रम घेतले.

# ९ महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग ऑफिसर रणधीर सतीश यांची यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाला प्रशासकीय भेट




**सोलापूर । प्रतिनिधी**

येथील विद्या विकास मंडळाच्या यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील एन.सी.सी. विभागास ८ जानेवारी २०२५ रोजी ९ महाराष्ट्र बटालियन एन.सी.सी. सोलापूरचे कमांडिंग ऑफिसर कर्नल रणधीर सतीश यांनी प्रशासकीय भेट दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल.बी. पाटील यांनी त्यांचे स्वागत केले. महाविद्यालयातील एन.सी.सी. कॅडेट्सने कर्नल रणधीर सतीश यांना गार्ड ऑफ ऑनर करून मानवंदना दिली. विजयश्री सभागृहात आयोजित कार्यक्रमात त्यांनी कॅडेट्सशी संवाद साधत बी आणि सी सर्टिफिकेट परीक्षेच्या तयारीबाबत मार्गदर्शन केले, तसेच एन.सी.सी.तून मिळणाऱ्या करिअर संधींबाबत माहिती दिली.

कार्यक्रमात प्राचार्य डॉ. एल.बी. पाटील यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना कॅडेट्सना शिस्त आणि सकारात्मक भावनांचा अंगीकार करून समाजात शिस्त रुजवण्याच्या प्रयत्नांवर भर दिला. तसेच देशाप्रती अभिमानाची भावना जोपासणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड, सहसचिव विक्रमसिंह सुर्यवंशी, उपप्राचार्य संभाजी किर्दाक यांचे वेळोवेळी एन.सी.सी. कॅडेट्सना मार्गदर्शन लाभत असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. कार्यक्रमात सुभेदार तानाजी चव्हाण, हवालदार बाळासाहेब पठाडे आणि एन.सी.सी. कॅडेट्स उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कॅप्टन डॉ. विजया गायकवाड यांनी केले, तर आभार प्रदर्शन सी.टी.ओ. प्रा. राम काळे यांनी केले.

## अखेर बीड बायपासवर उड्डाणपुल, सर्व्हिस रोडच्या निघाल्या निविदा

# केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी बीडकरांना दिलेला शब्द पाळला–डॉ.योगेश क्षीरसागर

**बीड (प्रतिनिधी)**

सोलापूर–छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गावर बीड शहरालगतच्या स्लीप रोडसह नहालक्ष्मी चौकात उड्डाणपुल बांधण्यासंदर्भातील तांत्रिक शक्यता तपासण्याचे निर्देश केंद्रीय भुपृष्ठ वाहतूक मंत्रालयाने दि. २७ जून २०२४ रोजी दिले होते. ही कार्यवाही पूर्ण करून बहुप्रतिक्षित असलेल्या बीड बायपासवरील उड्डाणपुलांसह सर्व्हिस रोडच्या निविदा विभागाने काढल्या आहेत. या कामाबद्दल लोकसभा निवडणुकीत माजलगावच्या जाहीर सभेतून केंद्रीय मंत्री ना. नितीन गडकरी यांनी बीडकारांना दिलेला शब्द पाळत वर्षभराच्या आत कामांच्या निविदा

तेलगाव आणि पिंपळनेर रस्त्यावरील स्लिप रोडची देखील मागणी करण्यात आली होती. या पत्रांचा संदर्भ देत ना. नितीन गडकरी यांच्या आदेशावरून भुपृष्ठ वाहतूक मंत्रालयाचे तांत्रिक सल्लागार बाळासाहेब ठेंग यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या नागपूर येथील प्रादेशिक अधिकार्यांना निर्देश दिले होते. यात उड्डाणपुल आणि स्लिप रोड संदर्भातील तांत्रिक शक्यता तपासून अहवाल सादर केला. त्यांनतर आता निविदा निघाल्या असून या कामाला गती मिळणार आहे. हा प्रश्न डॉ. योगेश क्षीरसागर यांनी सतत लावून धरला. मागे लोकसभा निवडणूक प्रचारादरम्यान माजलगाव येथे जाहीर सभेत हा प्रश्न मार्गी लावण्याची घोषणा ना. नितीन गडकरी यांनी केली होती. त्यानुसार विभागाकडून पाऊले उचलली गेली. परळीत गतवर्षी शासन आपल्या दारी कार्यक्रमात तत्कालीन उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, ना. अजितदादा पवार, तत्कालीन पालकमंत्री ना. धनंजय मुंडे यांच्याकडे बीड शहराजवळील उड्डाणपुलांसह स्लिप रोडचा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी डॉ. योगेश क्षीरसागर यांनी केली होती. त्या मागणीच्या अनुषंगाने दोघांनीही केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्रालयाकडे शिफारस केली होती. तसेच, मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी हा प्रलंबित प्रश्न ना. नितीन गडकरींच्या कानावर घातला होता. दरम्यान, उड्डाणपुलांसह स्लिप रोडचा प्रश्न मार्गी लागत असल्याने डॉ. योगेश क्षीरसागर यांनी केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री ना. नितीन गडकरी यांच्यासह इतर नेत्यांचे आभार मानले आहे.



# जोरगेवारांचे वजन वाढवून ; मुख्यमंत्री यांना चंद्रपूर ताब्यात घ्यायचे आहे का?

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्याचा चेहरामोहरा बदलणारा, महाराष्ट्रात नव्हे तर देशात आणि देशाच्याही बाहेर चंद्रपूरचे नाव पोहोचविणारा 'चंद्रपूरचा वाघ' म्हणून सुधीर मुनगंटीवार यांचे नाव लोकप्रिय आहे. पण मुनगंटीवार यांचे राजकारण संपवण्यासाठी प्रयत्न सध्या चालू आहे. हे कोण करते आहे हे पूर्ण महाराष्ट्राला माहीतचं नाही तर खात्री आहे. आता चंद्रपुरात कुरघोडी करून चंद्रपूर ताब्यात घेण्याचा मुख्यमंत्री यांचा तर प्रयत्न नाही ना, अशीही शंका व्यक्त केली जात आहे.

राज्याचे मंत्रिमंडळ जाहीर झाले, पण त्यात मुनगंटीवारांना स्थान देण्यात आले नाही. यामागे कोण आहे, हे साऱ्या महाराष्ट्रीला कळले. मुनगंटीवारांना डावलून चंद्रपूरला विकासाच्या प्रवाहापासून लांब ठेवण्याचाच प्रयत्न त्यांनी केला. माजी मंत्री मुनगंटीवार यांनी गेल्या दहा वर्षांत केलेले काम देशभर पोहोचले. अगदी ब्रिटनच्या संग्रहालयात जाऊन महाराजांची वाघनखं भारतात घेऊन आले. त्याची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही दखल घेतली. आपल्याशिवाय दुसरं कुणीही मोदींपर्यंत पोहोचू नये, यासाठी फडणवीस काहीही करू शकतात, याचा अनुभव भाजपमधील इतर नेत्यांनीही घेतला आहे.

आता मुनगंटीवारांकडे दुर्लक्ष करायचे आणि चंद्रपूरमधीलच दुसऱ्या आमदाराचे वजन वाढवायचे, हा फडणवीसांचा नवा डाव आहे, असे दिसून येत आहे. त्याशिवाय आमदार किशोर जोरगेवार यांच्यात मुनगंटीवारांचा जाहीर अपमान करण्याची हिंमत होऊच शकत नाही. त्यामुळे मुख्यमंत्री चंद्रपूरच्या विकासाकडे लक्ष देण्याऐवजी स्थानिक भाजपा कार्यकर्त्यांमध्ये तेढ निर्माण करण्याचं काम करत आहेत, असा आरोप आता होऊ लागला आहे. एका मंडप डेकोरेशनचे काम करणाऱ्या एका कार्यकर्त्याला आमदार करण्यासाठी सुधीर मुनगंटीवारांनी एकेकाळी जंग पछाडली. तो कार्यकर्ता म्हणजे चंद्रपूरचे विद्यमान आमदार किशोर जोरगेवार होय. मुनगंटीवार माझे गुरू आहेत, असं अभिमानाने सांगत फिरणाऱ्या जोरगेवारांमध्ये आज अचानक आपल्या गुरूचा अपमान करण्याचं बळ कोठून आलं, असा संतप्त सवाल सध्या सर्वसामान्य कार्यकर्ता विचारत आहे. विधानसभा निवडणुकीत माजी मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांचे कार्यकर्ते किशोर जोरगेवार यांच्यासाठी राबराब राबले. जोरगेवारांचा विजय निश्चित केला. आज त्याच जोरगेवारांनी एका कार्यक्रमासाठी प्रकाशित केलेल्या पत्रिकेत मुनगंटीवारांचे नाव सर्वांत खालच्या क्रमाला टाकून अपमानाची परिसीमा गाठली.

मा. सां. कन्नमवार शतकोत्तर रौप्य महोत्सवी जयंती सोहळ्याच्या कार्यक्रमाचे आमदार जोरगेवार स्वागताध्यक्ष आहे. अर्थात तेच या कार्यक्रमाचे यजमान आहेत. पण या कार्यक्रमाच्या उद्घाटन सोहळ्याची पत्रिका भाजप कार्यकर्त्यालाच नव्हे तर सर्वसामान्य चंद्रपूरकरांना देखील संताप आणणारी आहे. या पत्रिकेत उद्घाटक म्हणून मुख्यमंत्र्यांचे नाव सर्वांत वर आहे. ते स्वाभाविक देखील आहे. त्यानंतर माजी मंत्री हंसराज अहीर, विधानसभेचे विरोधीपक्षनेते विजय वडेट्टीवार, स्वतः जोरगेवार या क्रमाने नावं आहेत. त्यानंतर अगदी छोट्या अक्षरांमध्ये ज्या पाहुण्यांची नावं आहेत, त्यातही तिसऱ्या क्रमांकाला मुनगंटीवार यांचं नाव आहे. ज्या नेत्याने तहान, भुक, झोप विसरून चंद्रपूरच्या विकासासाठी परीश्रम घेतले, त्यांचा हा अपमान भविष्यात भाजपसाठीच डोकेदुखी ठरण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

# खा.सोनवणे यांच्याबद्दल वक्तव्य करणाऱ्या पोनि.मुंडे यास बडतर्फ करण्याची मागणी



**अंबाजोगाई (प्रतिनिधी):** बीड जिल्ह्याचे खा. बजरंग सोनवणे यांच्याविषयी आक्षेपार्ह, वादग्रस्त व गैर कायदेशीर भाषेचा वापर करून लोक प्रतिनिधीचा अपमान करणाऱ्या सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश मुंडेला तात्काळ सेवेतून बडतर्फ करा अशी मागणी तालुकाध्यक्ष अमर देशमुख यांनी केली आहे. याप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे वतीने ७ जानेवारी रोजी मुख्यमंत्र्यांना उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फत निवेदन देण्यात आले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष अमर दगडुसाहेब देशमुख यांनी मागणी करून दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, लोकसभेतील बीड जिल्ह्याचे खा. बजरंग सोनवणे यांचे विरूद्ध पोलिस दलातील सहाय्यक पोलिस निरीक्षक गणेश मुंडे याने अश्लील, अभद्र, अपमानास्पद अशा भाषेचा वापर करीत बीड पोलिस दलातील पोलिस अधिक्षक यांच्या अधिपत्याखाली सुरू असलेल्या 'बीड पोलिस प्रेस' या ग्रुप वरून सदर आक्षेपार्ह मजकुर प्रकाशित करून बीड जिल्ह्याचे लोक प्रतिनिधी असलेले विद्यमान खासदार यांचा अपमान करून स्वतः फौजदारी स्वरूपाचा गुन्हा केलेला आहे. सदर पोलिस अधिकारी हा कायदेशीर पदावर नियुक्त असताना व सदर प्रकार गुन्ह्याच्या सदरात मोडतो हे माहित असताना ही त्याने जाणिवपुर्वक हा गुन्हा केलेला आहे. ज्यामुळे कायदा व सुव्यवस्था राखणाऱ्या पोलिस दलाची प्रतिमा मलीन झालेली आहे. ही बाब बीड पोलिस दलातील वरिष्ठ पातळीवरील अधिकाऱ्यांना ज्ञात झालेली आहे. तरी सुद्धा सदर इसम गणेश मुंडे याचे विरूद्ध फौजदारी गुन्ह्याची नोंद अद्यापपर्यंत झालेली नाही. सदर गणेश मुंडे याने लोक प्रतिनिधीचा अपमान करून पोलीस दलाची प्रतिमा मलीन केल्यामुळे त्याचेविरूद्ध योग्य व आवश्यक गुन्ह्याची नोंद करून गणेश मुंडे यास तात्काळ पोलिस दलातून बडतर्फ करण्यात यावे, सदर निवेदनाची दखल घेवून सहाय्यक पोलीस निरीक्षक मुंडे याचेविरूद्ध मागणी प्रमाणे आवश्यक कार्यवाही न झाल्यास या विरूद्ध राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे वतीने लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. सदरील निवेदनावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष अमर देशमुख, दिपक शिंदे, ॲड.प्रशांत पवार, ॲड.अविनाश भोसले, ॲड.शहाजहान खान पठाण, ॲड.इस्माईल गवळी, अमोल चव्हाण, तानबा लांडगे, यशोधन लोमटे, रोहित हुलगुंडे, ईश्वर शिंदे, प्रमोद भोसले, राहुल सिरसट, रविंद्र मोरे, जनक गडकर, गणेश घाडगे, किशोर उंडरे, दिपक बेले, आश्रुबा करडे, अतुल साखरे, किरण पवार, विजय चव्हाण, विष्णू बरकते, पंकज मोरे, रमेश कदम आदींसह इतरांच्या स्वाक्षऱ्या आहेत

# अनाथालयातील अनाथांना मायेची ऊब देऊन संपादक-पत्रकार ग्रुपच्यावतीने दर्पणदिन साजरा



**गेवराई (प्रतिनिधी):** गेवराई येथील संपादक-पत्रकार ग्रुपच्या वतीने बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृती प्रित्यर्थ सोमवार, दिनांक ६ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता शहराजवळील सहारा अनाथालय बालग्राम येथील मुलांना मायेची ऊब देऊन अनाथ मुलांसोबत दर्पण दिन (पत्रकार दिन) उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी अनाथालयातील मुला-मुलींना ब्लँकेटचे वाटप करण्यात आले.

मराठी वृत्तपत्र सृष्टीचे बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ संपादक-पत्रकार ग्रुपच्या वतीने गेवराई येथे दरवर्षी विविध सामाजिक उपक्रमांनी दर्पण दिन (पत्रकार दिन) साजरा करण्यात येतो. यावर्षीही दिनांक ६ जानेवारी २०२५ रोजी (सोमवारी) सकाळी ११ वाजता गेवराई शहराजवळील सहारा अनाथालय बालग्राम येथे दर्पण दिन आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अनाथालयाचे संचालक संतोष गर्जे हे होते. यावेळी अनाथालयातील अनाथ मुला-मुलींना ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. प्रारंभी बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी पत्रकारितेत पी.एच.डी. साठी पात्र ठरलेले गेवराई तालुक्यातील एकमेव जेष्ठ पत्रकार सुभाष सुतार यांनी दर्पण दिनाबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले. तर संतोष गर्जे यांनी अध्यक्षीय समारोप केला. आपल्या प्रास्ताविक भाषणात ज्येष्ठ पत्रकार काझी अमान यांनी संपादक-पत्रकार ग्रुपच्या वतीने दरवर्षी राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती देऊन सर्व पत्रकार बांधवांना दर्पण दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. साप्ताहिक गौरीपूर दर्शनचे ज्येष्ठ संपादक शिवाजी मामा ढाकणे यांनी हसत-खेळत या कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन केले, तर दैनिक सामनाचे प्रतिनिधी प्रदीप जोशी यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले. यावेळी सहारा अनाथालय बालग्रामच्या वतीने सर्व पत्रकार बांधवांना अन्याय-अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी लेखणी सप्रेम भेट देण्यात आली.

या कार्यक्रमास काझी अमान (दैनिक दिव्य लोकप्रभा), प्रदीप जोशी (दैनिक सामना), शिवाजी मामा ढाकणे (साप्ताहिक गौरीपूर दर्शन), सिद्धांत मोरे (साप्ताहिक राजतंत्र), दत्तात्रय लाड (दैनिक बळीराजा), बप्पासाहेब पिंपळे (दैनिक प्रजापत्र), सय्यद कौसर (दैनिक जंग), नितीन वाकडे (दैनिक झुंजार नेता), सुमेध करडे (दैनिक आरंभ), वाल्मीक कदम (ग्रामीण पत्रकार) यांच्यासह बालग्रामचे बाळासाहेब नागरे, संदीप नेहे, अर्जुन देवकते, नंदा पवार, योगेश कारंडे, सुवर्णा भालेराव, गोपाल ईश्वरे, गोविंद वेल्हाळ, राहुल पाटील तसेच संपादक-पत्रकार ग्रुपचे सर्व पदाधिकारी व सदस्य आवर्जून उपस्थित होते.

# दिव्यांगा बाबत बेताल वक्तव्य करणाऱ्या आ.सुरेश धस यांच्यावर कारवाई करा-अशोक आठवले



**बीड( प्रतिनिधी):** परभणी येथे ४ जानेवारी रोजी सर्व पक्षीय मोर्चाच्या जाहिर सभेत आ. सुरेश धस यांनी दिव्यांगांच्या बाबतीत असभ्य आणि अवमानकारक वक्तव्य केले. बेताल वक्तव्य करणाऱ्या या आमदाराला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समज द्यावी आणि त्यांनी समस्त दिव्यांगांची जाहिर माफी मागावी. मुख्यमंत्र्यांनी दिव्यांग कायद्यानुसार सुरेश धस यांच्यावर कठोर कार्यवाही करावी. जर मुख्यमंत्र्यांनी दखल घेऊन कार्यवाही केली नाही तर मुख्यमंत्र्यांच्या मुंबई शासकीय निवासस्थाना समोर दिव्यांग न्याय हक्कासाठी लोकशाही मार्गाने आंदोलन करतील असा इशारा पत्रकार परिषदेत प्रदेश उपाध्यक्ष शासनमान्यता प्राप्त महाराष्ट्र राज्य दिव्यांग कर्मचारी संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष अशोक आठवले यांच्यासह जिल्हा प्रहार दिव्यांगक्रांती आंदोलन विक्रम मोमीन, रघुनाथ तोंडे आणि शाहु डोळस यांनी दिला आहे.

बीड येथील शासकीय विश्रामगृह येथे ८ जानेवारी रोजी दुपारी महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी, अधिकारी संघटना आणि जिल्हा प्रहार दिव्यांग क्रांती आंदोलन संघटनेने पत्रकार परिषद घेऊन आमदार सुरेश धस यांचा जाहिर निषेध व्यक्त करत भुमीका मांडली. या पत्रकार परिषदेला संबोधीत करताना पुढे ते म्हणाले की, बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घुणपणे हत्या झाली या घटनेचा तीव्र शब्दात दिव्यांग संघटना निषेध व्यक्त करते. देशमुख यांच्या मारेकरांना फाशीची शिक्षा झाली पाहिजे अशी मागणी देखील करते. त्याचबरोबर परभणी येथे घडलेल्या घटनेचाही निषेध व्यक्त करते. परभणी येथे ४ जानेवारी २०२५ रोजी सर्व पक्षीय मोर्चाच्या जाहिर सभेत बीड जिल्ह्यातील आष्टी विधानसभा मतदार संघातील आमदार सुरेश धस यांनी हजारो, लाखो लोकांच्या समोर भाषण करताना दिव्यांग व्यक्तीबाबत व्यंग वाचक वक्तव्य केले. त्यांनी हातवारे करून दिव्यांगांच्या संदर्भात केलेल्या बेताल वक्तव्याने समस्त दिव्यांगांच्या भावना दुखावल्या आहेत. त्यांच्या वक्तव्याची ध्वनीचित्रफीत सोशल सामाजिक प्रसार माध्यमातुन वायु वेगाने प्रसारीत झाल्याने दिव्यांग व्यक्तींना याचा जास्त मानसीक त्रास झाला आहे. आम्ही आमच्या न्यायहक्कासाठी मुख्यमंत्री तसेच दिव्यांग आयुक्त यांच्याकडे आमदार महोदयांची लेखी तक्रार करून या बेताल वक्तव्य करणाऱ्या आमदाराविरूद्ध कारवाईची मागणी करणार आहोत असे पत्रकार परिषदेत स्पष्ट केले.

# कलादालनामुळे सौताडा शाळेतील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मिळतोय वाव



**सौताडा (प्रतिनिधी):** यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई यांच्याकडून शिक्षण क्षेत्रातील नावीन्यपूर्ण प्रकल्पासाठी दिली जाणारी सन्मानाची 'शरद पवार इन्स्पायर फेलोशिप' सौताडा शाळेतील शिक्षक शेख मुख्तार यांना कलादालन.. प्रवास टाकाऊ पासून टिकाऊ पर्यंतचा' या उपक्रमासाठी मागील वर्षी घोषित झाली होती.

या फेलोशिप अंतर्गत नाविन्यपूर्ण प्रकल्प राबविला असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव मिळत आहे. या कलादालनमध्ये प्लास्टिक बाटल्यांचा वापर करून त्यापासून विविध प्रकारच्या वस्तू तयार करण्यात आलेल्या आहेत.त्याचप्रमाणे शेतीतील भुसा, प्लास्टिकच्या पिशव्या, नारळाच्या करवंट्या, सुतळी , काथ्या अशा विविध टाकाऊ वस्तूंचा उपयोग करून गृह उपयोगी तसेच शोभेच्या वस्तू तयार करण्यात आलेल्या आहेत.टाकाऊ वस्तूंचा वापर केल्यामुळे पर्यावरण संवर्धन होत आहे. प्लास्टिकसारख्या वस्तूचां पुनर्वापर केल्यामुळे त्या वस्तू वापरात येऊ लागल्यामुळे परिसरातील, त्याचप्रमाणे गावातील कचरा कमी होण्यात मदत होत आहे. कलादालनामुळे स्वनिर्मितीचा आनंद विद्यार्थ्यांना मिळत असल्यामुळे विद्यार्थीही स्वयं प्रेरणेने सदरील उपक्रमात सहभागी होत आहेत . या उपक्रमाबरोबरच सौताडा शाळेत संगणक कक्ष, डिजिटल क्लासरूम , कोडींग लॅब, स्पर्धा परीक्षा, खेळ इत्यादीच्या माध्यमातून शाळा प्रगती करत आहे. या वर्षी शाळेला मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेत तालुक्यात द्वितीय क्रमांक तर परसबाग स्पर्धेमध्ये तालुक्यात प्रथम क्रमांक प्राप्त झालेला आहे. यासाठी कष्ट घेणारे शाळेतील सर्व शिक्षक वृंद, मुख्याध्यापक यांचे शालेय व्यवस्थापन समिती व शिक्षण विभाग यांच्यातर्फे अभिनंदन करण्यात आले.

# ग्लोबल प्री प्राइमरी आणि शांतीनिकेतन इंग्लिश स्कूलमध्ये 'ध्यान धारणा' प्रशिक्षण शिबिर

**बीड (प्रतिनिधी):** शालेय विद्यार्थ्यांसाठी अध्ययन करत असताना मनाची एकाग्रता आणि ध्यानधारणा करणे हे क्रमप्राप्त असते आपले मन आपल्या नियंत्रणात ठेवून ज्ञानाची साधना केली तर यश हमखास मिळते हा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याकरिता प्रियदर्शनी महिला बहुउद्देशीय व ग्रामीण सेवाभावी संस्था संचलित ग्लोबल प्री प्राइमरी नी शांतिनिकेतन इंग्लिश स्कूल मध्ये या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे आयोजक 'अर्हम विज्जा 'अष्ट मंगल मंगल मेडिटेशन' या संस्थेच्या वतीने करण्यात आले होते.

या प्रशिक्षण शिबिरासाठी इयत्ता आठवी ते दहावी या वर्गातील विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आला होता. विद्यार्थ्यांना परीक्षा तसेच विविध क्षेत्रातील अध्ययन प्रक्रिया सुलभ व्हावी याकरिता ध्येय धारणेचे उत्कृष्ट प्रात्यक्षिक संबंधित संस्था प्रचारक यांच्याद्वारे दर्शवण्यात आले. विद्यार्थ्यांनी त्यांच्याद्वारे सांगितल्या गेलेल्या सर्व सूचनांचे पालन करताना ध्यानधारणा प्राप्त करण्यासाठीची कसं आत्मसात करण्याचा प्रयत्न केला. मेडिटेशन ग्रुप च्या वतीने सौ.नम्रता बोरा, सौ.कीर्ती गांधी, सौ. प्रीती खिवंसरा,सौ. दिपाली लोढा, सौ. स्वीटी बोथरा, सौ. दीपा लोढा, सौ. शिल्पा चोरडिया उपस्थित होत्या.याप्रसंगी शिक्षण संस्थेच्या वतीने शाळेचे प्राचार्य श्री.अनिल जोशी सर यांनी मान्यवरांचे आभार मानले. शिक्षण संस्थेच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन शाळेतील शिक्षिका सौ. जयश्री नाईक मॅडम, सौ.राजश्री गवते मॅडम, श्री.सचिन अग्रवाल सर, सौ. शितल कांबळे मॅडम यांनी केले होते.

# पी.एम. किसान आणि निराधार योजनेतील लाभार्थ्यांचे अनुदान आठवडाभरात मिळणार

**बीड । प्रतिनिधी**

संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीने पात्र केलेल्या १२ हजार लाभार्थ्यांना मंजुरी आदेश देवून नियमित अनुदान सुरु करावे, कृषी आणि महसुल विभागाच्या अधिकार्यांमध्ये समन्वय नसल्यामुळे प्रलंबित राहिलेल्या पी.एम.किसान योजनेतील ३ हजार पात्र लाभार्थ्यांना तात्काळ अनुदान सुरु करण्यासह ग्रामपंचायत विभक्तीकरण, प्रलंबित मावेजा प्रकरणे यांसह विविध विषयासंदर्भात आ.विजयसिंह पंडित यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेतली. जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी या प्रश्नाच्या अनुषंगाने संबंधित अधिकार्यांना सूचना देवून पात्र लाभार्थ्यांना आठवडाभरात अनुदान मिळेल असे आश्वासन दिले. विविध विषयात येणार्या अडचणीच्या अनुषंगाने प्रशासकीय पातळीवर मार्ग काढण्याच्या सूचना त्यांनी यावेळी केल्या. बैठकीला जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

गेवराई विधानसभा मतदार संघातील विविध विषयांच्या अनुषंगाने आ.विजयसिंह पंडित यांनी जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची भेट घेतली. संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीने गेवराई तालुक्यातील सुमारे १२ हजार पात्र लाभार्थ्यांचे अर्ज मंजुर केले आहेत. मात्र तहसिल कार्यालयातील दफ्तर दिरंगाईमुळे पात्र लाभार्थ्यांना मंजुरी आदेशाचे वाटप न केल्यामुळे मागील चार महिण्यांपासुन निराधार लाभार्थी अनुदानापासुन वंचित होते. कृषी आणि महसुल अधिकार्यांमध्ये समन्वय नसल्यामुळे शुल्लक त्रुटी काढुन तालुक्यातील तीन हजार लाभार्थी पी.एम. किसान योजनेच्या रास्त लाभापासुन वंचित आहेत. या दोन्ही प्रश्नांबाबत आ. विजयसिंह पंडित यांनी बैठकीत विचारणा केली. त्याच बरोबर या बैठकीत ग्रामपंचायत विभक्तीकरण करुन बंजारा तांड्यांना स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा देणे, प्रलंबित भुसंपादनाची प्रकरणे, श्रीक्षेत्र राक्षसभुवन येथील तिर्थक्षेत्र विकास आराखडा यासह विविध विषयांवर या बैठकीत चर्चा होवुन अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लावले.

प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधी योजना (पी.एम. किसान) मधील अपात्र झालेल्या सुमारे तीन हजार लाभार्थी शेतकर्यांना आवश्यक असलेले महसुली पुरावे उपलब्ध करुन देण्याच्या सुचना जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी तहसिलदारांना दिल्या. कृषी विभागाचे उपसंचालक आणि जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांच्या स्तरावर प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा निपटारा तात्काळ करुन कृषी आयुक्त कार्यालयाला सादर करणार आहेत. सुमारे २१०० लाभार्थ्यांना पुढील आढवडेभरात अनुदान सुरु करणार असल्याचे या बैठकीत नियोजन करण्यात आले. संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील पात्र लाभार्थ्यांना मंजुरी आदेश देण्यासाठी लागणार्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांच्या याद्या उपलब्ध करुन देण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी दिले. त्यामुळे पुढील पाच दिवसात योजनेतील पात्र लाभार्थ्यांना मंजुरी आदेशाचे वाटप करुन अनुदान वितरणाची प्रक्रिया सुरु करणार असल्याचे तहसिलदार खोमणे यांनी सांगितले. त्यामुळे गेवराई तालुक्यातील गोर-गरीब लाभार्थ्यांचे प्रश्न मार्गी लावण्यात आ. विजयसिंह पंडित यांना यश आले आहे.